महाराष्ट्राचे आराध्य दैवत,
छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड



www.surajyadigital.com | रविवार, दि.१९ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १४२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# केंद्र सरकार सहकार विद्यापीठ स्थापणार

## कुशल मनुष्यबळ गावातच तयार करणार

✔ सुराज्य/सोलापूर

**'भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया असणारा सहकार संपला नाही तर टिकला पाहिजे. त्यासाठी सहकार क्षेत्र मजबूत झाले पाहिजे, हे केंद्र सरकारचे धोरण आहे. याच धोरणाचा एक भाग म्हणून सहकार क्षेत्रासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी केंद्र सरकार आता सहकार विद्यापीठ स्थापन करणार आहे,' अशी घोषणा करतानाच इथेनॉल निर्मितीसाठी एनसीडीसी आर्थिक मदत करणार आहे. शिवाय रिझर्व्ह बँकेनेही याकामी नियमात शिथिलता आणण्याचे मान्य केले आहे, अशी माहिती केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी दिली.**






केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री असणारे अमित शहा सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून शनिवारी येथे एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही घोषणा केली. सहकार क्षेत्राचे मजबुतीकरण करण्याचे काम केंद्र सरकारने हाती घेतले आहे, त्यासाठी लागणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी सहकार मल्टीपर्पज युनिव्हर्सिटी (सहकार विद्यापीठ) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगून शहा म्हणाले की प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठाचे एक केंद्र असेल. बहुतांशी कोर्सेस ऑनलाईन, तर काही कोर्सेस हे प्रत्यक्ष वर्गात होतील. या विद्यापीठातून सहकारी सोसायट्या, अकाउंटिंग, बँकिंग,डेअरी, साखर कारखाने, गोदामे आदींसाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाईल.

### गावातील सोसायटीची थेट नाबार्डला जोडणी

गावपातळीवरील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या (प्राथमिक कृषी पतसंस्था) मजबूत करण्यावर केंद्र सरकारने भर दिला आहे. या सर्व सोसायट्या संगणकीकृत बनवून खास सॉफ्टवेअरच्या माध्यमातून गावची सोसायटी जिल्हा सहकारी बँकेला, जिल्हा बँक ही राज्य बँकेला आणि राज्य बँक नाबार्डला जोडण्यात येणार आहे. त्यांचे ऑडिट करण्याचे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारने हे काम आता त्वरित सुरू करावे, अशी सूचना शहा यांनी राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांना यावेळी केली.

### ऑडिट नसेल तर ९० दिवसात अवसायनात

एखाद्या गावातील सहकारी सोसायटी बंद पडली तर त्या गावात दुसऱ्या सोसायटीला परवानगी मिळत नाही. यापुढे तसे होणार नाही. एखाद्या सोसायटीचे सलग तीन वर्षे ऑडिट झाले नसेल तर ९० दिवसांनंतर ती सोसायटी दिवाळखोरीत टाकली जाईल. त्या ठिकाणी नवी सोसायटी सुरू होईल. मात्र त्याठिकाणी जुनी सोसायटी बुडवणाऱ्यांना नव्या सोसायटीत सभासद होता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. हे काम पश्चिम बंगाल वगळता ८० टक्के काम पूर्ण झाल्याचेही शहा यांनी यावेळी सांगितले.

### कारखान्यांचा प्राप्तिकर माफ

साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी गावात गोदामे उभारण्यासाठी सोसायट्यांना अधिकार देण्यात येतील. सरकार जे खरेदी करेल, ते गावातच साठवले जाईल. त्यातून वाहतूक खर्च कमी होईल. सहकार क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारे कायदे मोदी सरकारने केले आहेत. पूर्वी एफआरपीपेक्षा जादा दर देणाऱ्या कारखान्यावर प्राप्तिकर लागत होता, तो माफ करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे, अशीही माहिती सहकारमंत्र्यांनी यावेळी दिली.

### हर्षवर्धन मेरा सर खाता है



इथेनॉल निर्मिती प्रकल्पाला पतपुरवठा मिळावा यासाठी राज्याचे माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील हे सध्या पाठपुरावा करत आहेत. याचा उल्लेख करताना 'ये हर्षवर्धन मेरा सर खा जाता है हमेशा' असे सांगून शहा म्हणाले की इथेनॉल निर्मिती प्रकल्पाला महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून सहकार्य करण्याचे धोरण एनसीडीसीने घेतले आहे. तसेच, सहकारी साखर कारखान्यांच्या पतपुरवठ्यासाठी रिझर्व्ह बँकेनेही नियमांमध्ये शिथिलता आणण्याचा निर्णय घेतला आहे.

शिवजयंती विशेष
पान २ वर

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आधी आम्हाला वाचवा,
मग चित्ते आणा !

कल्याण
700-73-355



शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात रात्री १२ वाजता पाळण्याचा कार्यक्रम जल्लोषात साजरा झाला. यावेळी हजारो महिला जिजाऊच्या वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या.

### महिलेस काठीने मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : मंगगवेढा तालुक्यातील बठाण येथे ज्वारीची मळणी करताना भुस्कट घरात आल्याच्या कारणावरून तोंडावर तिखट टाकून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणी दोन महिला जखमी झाल्या. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. कविता अविनाश पाटील (वय २९) आणि त्यांची जाऊ राणू शशिकांत पाटील या दोन्ही जखमी झाल्या.

या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी अश्विनी अरुण घोडके पाटील आणि रंजना घोडके पाटील (रा.बठाण) या दोन्ही विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला. ज्वारीचा भुसा वाऱ्याने घरात उडून गेल्याच्या कारणावरून हा प्रकार घडला.

### ऊसाच्या ट्रॅक्टरची धडक; दिल्याने पत्नी ठार; पती जखमी

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

उसाने भरलेला ट्रॅक्टरने भरधाव वेगात येऊन समोरून दुचाकिस्वारास दिलेल्या धडकेत दुचाकिस्वाराची पत्नी ठार झाली तर दुचाकिस्वार जखमी झाला आहे. ही घटना दि.१६ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास कव्हे शिवारातील पालखी मार्गावर घडली. या अपघात राणी गणेश डुंगळेश्वर (वय ४२) या जागीच ठार झाल्या तर गणेश बाबूराव डुंगळेश्वर (रा.कव्हे, ता.माढा) हे जखमी झाले.



गणेश डुंगळेश्वर हे आपल्या पत्नीसह दुचाकीवरून (एम एच ०३/एजे-२७९९) शेताकडे जात असताना १०.४० वा.सुमारास कव्हे शिवारातील पालखी मार्गावरील काळे यांच्या शेतासमोर समोरून भरधाव वेगात येणाऱ्या उसाने भरलेल्या ट्रॅक्टरने जोराची धडक दिली. यावेळी गणेश हे हा डाव्या बाजूस पडले तर त्यांची पत्नी रोडवर पडली.तिच्या डोक्यावरून ट्रॅक्टरचे चाक गेल्याने ती मरण पावली. अपघातानंतर ट्रॅक्टरचालक ट्रॉलीसह निघून गेला. गणेश यांच्या डोक्याला व पायाला मार लागला आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टरच्या अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### शिवजयंतीनिमित्त पोलिसांचा कडक बंदोबस्त

✔ **सोलापूर** : शहरात शिवजयंती निमित्त पोलिसांचा कडक बंदोबस्त राहणार असून,मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने रविवारी दुपारी ४ वाजता डाळिंबी आड येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित मूर्तीची विधिवत पूजा करून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येणार आहे.



मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस आयुक्तालयाकडून खबरदारी घेण्यात आली आहे. जवळपास १२०० पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांचा बंदोबस्त या मिरवणूक करता लावण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिली. यात ३ पोलीस उपायुक्त, ५ सहायक पोलीस आयुक्त, २० पोलीस निरीक्षक, ५६ सहायक पोलीस निरीक्षक, ८७३ पोलीस अंमलदार, ४० महिला पोलीस अंमलदार, २० एस आर पी एफ प्लॅटुन आणि ४०० होमगार्ड असा हा बंदोबस्त असणार आहे. मिरवणुकीत डॉल्बी, डीजे लावू नये असे पोलीस प्रशासनाने यापूर्वीच सर्व मंडळांना सुचित्त केले आहे.शहरातील जवळपास ६० ते ७० उत्सव मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविणार आहेत. मिरवणुकीचे मार्ग निश्चित झाले आहेत. व त्या दृष्टीने नागरिकांना वाहतुकीस कोणतेही अडचणी निर्माण होणार नसून वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे.

### अपघातातील जखमी तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : दुचाकी वरून प्रवास करताना दुचाकी घसरून गंभीर जखमी झालेला आशिष ज्ञानेश्वर सुतार (वय २१ रा.आढेगाव ता. माढा) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी सकाळी मयत झाला. तो १० फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास आढेगाव ते वांगी असा प्रवास करीत होता. शेलगाव पाटी जवळ दुचाकी घसरल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला करमाळा येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्ध अवस्थेत सोलापुरात दाखल करण्यात आले होते. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



# शिवजयंती विशेष



## प्रेरणेचा एक अखंड स्त्रोत

दिवस असो, रात्र असो, उन्हाळा असो, पावसाळा
असो, अमावस्या असो, पौर्णिमा असो, शुभ असो,
अशुभ असो,
दिली आम्हांला सदैव काम करण्याची प्रेरणा...
स्त्री माता असो, भगिनी असो, सखी असो,
सहचारिणी असो, घरची असो, परस्त्री असो,
महाराजांनी
दिली आम्हांला स्त्रियांचा सन्मान करण्याची...
माणूस शत्रू असो, मित्र असो, सगा असो,
सोयरा असो,
महाराजांनी दिली आम्हांला
वार सोसण्याची प्रेरणा...
परिस्थिती अनुकूल असो, बिकट असो, सुकाळ
असो, दुष्काळ असो, महाराजांनी
दिली आम्हांला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा...
गरीब असो, श्रीमंत असो, आपला असो, परका
असो, महाराजांनी दिली आम्हांला
सर्वांना मदत करण्याची...
परिस्थिती कशीही असो, प्रसंग कोणताही असो,
सद्सद्विवेकबुद्धी पाळून, आत्मसन्मान बाळगून,
महाराजांनी दिली आम्हांला माणूस
म्हणून जगण्याची प्रेरणा...
महाराजांनीच दिली आम्हांला
माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा...

- **संभाजी दीक्षीत,**
सहशिक्षक, रावजी सखाराम हायस्कूल, सोलापूर.
(मो. नं. ९८९०३९६८६८)

**शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला ताब्यात घेतला तसेच सतराव्या वर्षी रायगड व कोंढाणा किल्ला ताब्यात घेतला. १६७४ मध्ये महाराजांची रायगडावर छत्रपती म्हणून निवड झाली. भारतीय इतिहासात त्यांचे योगदान पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे शिवाजी महाराजांनी मराठी आणि संस्कृत भाषेचा विस्तार केला. शिवाजी महाराज हे शूरवीर तर होतेच पण ते दानशूर होते तसेच ते न्यायी राजे होते. रयतेचा राजा कसा असावा, हे याचा आदर्श म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय.**

# || राजा शिवछत्रपती ||

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६६३ रोजी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शहाजी भोसले तर आईचे नाव जिजाबाई होते. मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र सरकारने निश्चित केल्याप्रमाणे हा सण १९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रभर साजरा केला जातो. हा महाराष्ट्रातील एक उत्सव आहे. १८६९ साली महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगड येथील समाधी शोधून काढली. समाधीची व्यवस्था सरकारने स्वत:कडे घ्यावी, असा अर्ज महात्मा जोतिबांनी केला होता. १८७० मध्ये महात्मा फुले यांनी पुणे येथे पहिली शिवजयंती साजरी केली. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सव सुरू केला. जनतेने एकत्र येऊन उत्सव साजरा करून राष्ट्रप्रेम जागवावे व ब्रिटिशांविरुद्ध लढा द्यावा हा हेतू होता.

जिजाबाईने अनेकदा शिवाजीला रामायण महाभारतातील शूर पराक्रमाच्या गोष्टी सांगितल्या. त्यातूनच शिवाजीवर योग्य संस्कार झाले. शिवाजीराजांना घोड्यावर रपेट कशी करावी याचे शिक्षण जिजाबाईंनी दिले. शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांवर व रयतेवर जिवापाड प्रेम केले. जातीपातीच्या भिंती तोडून सर्वांचा सन्मान केला. प्रत्येक मोहिमेनंतर शिवाजी महाराज तलवारी चालवणाऱ्या धारकऱ्यांचा व भाला फेकणाऱ्या निष्णात सैनिकांचा भालेराव अशी उपाधी देऊन गौरव करत. जे जिवावर उदार होऊन शत्रूंशी शह देतात, लढतात अशा सैनिकांना सोन्याचे कडे देत 'भय' हा शब्द महाराजांच्या ध्यानीमनी कधीही नव्हता. छत्रपतींच्या यशाचे गमक म्हणजे चोख व्यवस्थापन योग्य नियोजन माहिती गोळा करणे. यामुळे शिवाजी महाराजांना मोठे यश मिळाले. जिद्दीने चातुर्याने आणि योग्य बुद्धी वापरूनच अनेक समस्येवर त्यांनी मात केली, त्यातूनच स्वराज्याची स्थापना झाली. महाराजांकडे मोठी दूरदृष्टी होती. स्वराज्यासाठी काय करावे लागते याचा नेहमीच ते विचार करत असत. त्यांनी बांधलेले गड किल्ले याच्यावर चाल करताना शत्रूला हजारदा विचार करावा लागे. शत्रूचा धोका नेहमीच जमिनीवरून होतो तसेच पाण्यावरून होतो. या दूरदृष्टीतून त्यांनी जलदुर्गाची निर्मिती केली. हा संपन्न वारसा आजही महाराष्ट्र आनंदाने मिरवत आहे. गनिमी कावा हे शिवाजी महाराजांचे एकमेव हत्यार होते. अनेक मोहिमा लढाया शिवाजी महाराजांनी गनिमी काव्यानेच जिंकल्या होत्या. हिंदवी स्वराज्यात शिवाजी महाराजांकडे ४०० गड किल्ले होते, असे सांगितले जाते. महाराजांचा एक गड किल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतीकच होते. हिंदू असूनही शिवाजी महाराजांनी मुस्लिमांशी कधीही दुजाभाव मतभेद केला नाही, ते नेहमीच म्हणत आपली लढाई मुस्लीम धर्माशी नसून त्यांच्या साम्राज्याशी आहे, असे ते आपल्या सहकार्याला नेहमीच सांगत. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात स्त्रियांवर अन्याय, अत्याचार व हिंसाचार करणाऱ्यांना व स्त्रियांना त्रास देणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली होती. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे स्वप्न मनाशी बाळगले व रायरेश्वराच्या मंदिरात जाऊन जिवाला जीव देणाऱ्या मावळ्यांसोबत गुलामगिरी नष्ट करून स्वराज्याची स्थापना करण्याची शपथ घेतली. त्यावेळी सर्वत्र गुलामगिरी होती आणि समोर बलाढ्य शत्रू होते. स्वराज्य निर्मिती करण्यासाठी अनेक मावळ्यांनी आपले प्राण पणाला लावले होते. त्यामध्ये बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे मुरारबाजी अशा अनेक शूरवीरांनी शिवाजी महाराजांना साथ दिली.

शिवाजी महाराजांनी मावळ्यांच्या साथीनेच आपल्या समोरील बलाढ्य शत्रू अफजलखान, औरंगजेब, शाहिस्तेखान अशा अनेक शत्रूंना धूळ चारली. राजमाता जिजाऊने पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न त्यांनी सत्यात उतरविले. शिवरायांनी अनेक गड जिंकले आणि गुलामगिरी नष्ट केली. रयतेला अंधारातून प्रकाशात आणले. स्त्रियांना आदर व सन्मान दिला. शेतकऱ्यांना मानसन्मान दिला. ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी राजांचा राज्याभिषेक करण्यात आला आणि रयतेला लोक कल्याणकारी व न्यायप्रिय राजा मिळाला. मराठा साम्राज्याचा विचार केला तर सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव प्रथम येते. मराठा साम्राज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. वीर छत्रपती शिवाजी महाराज एक धाडसी, शूर आणि तेजस्वी मराठा सम्राट होते, ते धर्मनिष्ठ होते. भारतात वेळोवेळी अनेक बलवान आणि प्रसिद्ध व्यक्ती जन्माला आले आहेत, त्यापैकी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हे होय. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवता जपण्यासाठी आणि देशात मराठा साम्राज्य निर्माण करण्यासाठी समर्पित केले.

मुघल शासकांच्या अत्याचारातून भारतीय जनतेची सुटका केली. मुघल अधिकाऱ्यांशी सामना करून मराठा साम्राज्य उभे केले. जिजाबाईंमुळेच युद्ध कला घोडेस्वारी आणि राजकारण हिंदू धर्माबद्दल आदर हे गुण जिजाबाईंकडूनच ते शिकले होते. जिजाबाईंनी शिवाजी लहान असतानाच त्याच्यावर देशभक्ती आणि नैतिक चारित्र्याची बिजे रुजवली होती. शिवाजी महाराज कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. बालवयात हुशार, उत्साही, प्रतिभावंत होते. कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी त्यांना एकदा सांगावे लागे, त्यामुळे ते बाल वयातच युद्ध कलेत निपुण होते. बालवयात असे खेळ खेळत की त्यामुळेच युद्ध जिंकण्याची क्षमता त्यांच्या अंगी आली होती. लहानपणी ते आपल्या वयाची मुलं गोळा करून त्यांचा नेता बनायचे, युद्धाचा खेळ खेळून किल्ला जिंकायचे. वयाच्या १२ व्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा १४ मे १६४० रोजी सईबाई निंबाळकर यांच्याशी विवाह झाला. त्यांचा विवाह पुण्यातील लाल महालात झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा मावळ्यांच्या मनावर इतका ठसा उमटला की- सर्वांनी त्यांना मनापासून पाठिंबा दिला. महाराज नेहमीच आपल्याकडील चतुराईचा वापर युद्ध जिंकण्यास करत होते. छत्रपती शिवाजी महाराज हे एक उत्कृष्ट योद्धा आणि शासक होते. त्यांनी लहानपणापासूनच युद्ध कलेचा आणि शास्त्राचा अभ्यास केला.



शहाजीराजे हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी त्यासाठी एका हुशार शिक्षकाची नेमणूक केली. शिवराय सात वर्षाचे झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत शिवरायांना विविध विद्या, कला याचा परिचय झाला. शिवाजी महाराजांच्या सैन्यातील मावळ्यांनी शिवाजी राजांच्या सोबत हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मोठा सहभाग नोंदवला. सह्याद्रीच्या दोन डोंगर रांगाच्या मधल्या खोऱ्याला मावळ आणि खोऱ्यातील सैनिकाला मावळे म्हणतात येसाजींच्या विश्वासू व निष्ठावंत सहकार्यामुळे वयाच्या १७व्या वर्षी अनेक किल्ले त्यांनी जिंकले. छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्यावर नियंत्रण मिळवून कारभार पाहू लागले तेव्हा त्यांनी स्वराज्याची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली ही राजमुद्रा संस्कृत भाषेत आहे. त्याचा मराठी अनुवाद असा ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो तशी शहाजींचा पुत्र शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा लौकिक वाढत जाईल. १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःला संपूर्ण महाराष्ट्राचा शासक म्हणून घोषित केले आणि शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तेंव्हापासून छत्रपती पदवी धारण केली. तेव्हापासून शिवराज्याभिषेक शक सुरू केला आणि शिवराई हे चलन जारी केले. शिवाजी महाराज हे नाव घेताच डोळ्यासमोर येते ते दणकट शरीर, बुद्धिमान, शौर्य, धैर्याची मूर्ती एक महान देशभक्त आणि कुशल प्रशासक. त्यांचे पूर्ण नाव शिवाजी शहाजी भोसले होते. मराठी साम्राज्याचे संस्थापक उत्कृष्ट योद्धा, आदर्श शासनकर्ता सर्वसमावेशक सहिष्णू राजा म्हणून भारतीय आणि विशेषतत्त्वाने महाराष्ट्रीय इतिहासावर महत्त्वपूर्ण ठसा उमटवला.

- **प्रा. दादाराव डांगे, सोलापूर.**
(मो. नं. ९९२१७३५४०)

# जगाचे आदर्श

छत्रपती शिवाजी महाराजांनी जागतिक कीर्तीचे शासन निर्माण केले. राष्ट्र या विचारधारेची सुरुवात छत्रपतींच्या कालखंडमध्ये झाली. छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणेचे केंद्र आहेत. छत्रपती देशाचे नव्हेतर जगाचे राजे आहेत. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे राजे आणि जागतिक दर्जाचे योद्धे म्हणून छत्रपतींची ओळख आहे. छत्रपतींपासून प्रेरणा घेऊन अनेक देशांनी आपला इतिहास घडविला. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगामध्ये तहहयातच पोहोचलेले होते. जगातील महत्त्वाचे वृत्तपत्र असणाऱ्या लंडन गॅझेटने छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुरत मोहिमेची बातमी पहिल्या पानावर छापली व छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख महाराजे असा केला. १६७७ साली छत्रपतींनी जंजीर किल्ला जिंकल्यानंतर त्यांचे अभिनंदन करणारे पत्र डच कंपनीतील कोरोमंडल विभागाच्या गव्हर्नरने पाठवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जो पराक्रम भारत देशामध्ये केला, तसाच पराक्रम एका शतकानंतर अमेरिकेत १७७६ साली थॉमस जेफर्सन यांनी गाजविला. छत्रपतींनी जसा राज्याभिषेक केला, त्याच पद्धतीने ४ जुलै १७७६ रोजी त्यांनी स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

अमेरिकेमध्ये कॅलिफोर्नियातील सन जोन्स येथील ग्वाडालुपे रिव्हर पार्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात आलेले आहे. या पार्कमध्येच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची माहिती देणारा फलकही लावण्यात आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारी सामर्थ्याचे प्रतीक असणाऱ्या किल्ले विजयदुर्गवरती १८९८ मध्ये पाश्चात्य शास्त्रज्ञ लॅकिमर आले व त्यांनी दुर्बिणी उभ्या केल्या. खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी सूर्यावर संशोधन करून सूर्याभोवती हेलियम वायू असल्याचा जगातील एक महत्त्वाचा शोध लावला. पश्चिम आशियातील छोट्याशा देश इस्त्राईलने छत्रपतींचे गनिमी कावा हे युद्ध तंत्र वापरून अरबांचा पराभव करून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. इस्त्राईलमधील गायक मराठीमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे गाणे गाताना दिसतात. स्विर्झलँड या देशामध्ये जागतिक किल्ले प्रदर्शन भरविण्यात आले. त्यामध्ये किल्ले राजगडने प्रथम क्रमांक मिळविला.



व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष जेव्हा मरण पावले. तेव्हा त्यांच्या समाधी स्मारकावर 'छत्रपती शिवाजी महाराजांचा एक सैनिक समाधिस्थ झाला' असे वाक्य लिहिले आहे. आजही त्या समाधीवर हे वाक्य पाहावयास मिळते. चीनचे राष्ट्राध्यक्ष माओ त्से तुंगने जवळ-जवळ १ लाख सैन्यासह १६ ऑक्टोबर १९३४ रोजी कियांगसी व शान्सी अशा सहा हजार मैलाच्या प्रवासासाठी लॉग मार्च ही मोहीम काढली. ही मोहीम ३७० दिवस चालली. या प्रवासात १२ प्रांत, १८ पर्वतरांगा व २४ नद्या पार केल्या. या प्रवासासाठी चिनी जनतेने गनिमी कावा या युद्धतंत्राचा वापर केला. जागतिक पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धामध्ये इंग्रजांना विजय मिळवून देणारे भारतातील छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे होते, हे सत्य आहे.

बांगलादेशाचे शिल्पकार शेख मजिबूर रहेमान यांनी छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्याचे रक्षण केले. बांगलादेश मुक्त झाल्यावर राजधानी ढाक्यामध्ये विजयी मिरवणूक काढण्यात आली. त्या छत्रपतींच्या मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा घेऊन बांगलादेशीय छत्रपती भक्त आनंदाने नाचत होते आणि सांगत होते आमच्या विजयाचे शिल्पकार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती हे आमचे वॉर हिरो आहेत. शेजारी असणाऱ्या पाकिस्तानातील कराचीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी होते आहे. आखाती देश दुबई व पाकिस्तानातील छत्रपती भक्त आपल्या वाहनांवर महाराजांची प्रतिमा लावून त्यांची कीर्ती सांगताना दिसत आहेत. रशियातील संसदेच्या प्रवेशव्दारावर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा लावण्यात आलेली आहे. रशियातील संसद सदस्य छत्रपतींची प्रेरणा घेतात, हेच छत्रपतींच्या विचाराचे श्रेष्ठत्व होय.

२०१४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत 'छत्रपती शिवाजी महाराज द रिअल हिरो' या पुस्तकाचे प्रकाशन लंडन येथील हाउस ऑफ कॉमन्स या ब्रिटिश संसदेच्या सभागृहात करण्यात आले. पृथ्वीतलावरील समुद्रसपाटीपासून सर्वात उंच एव्हरेस्ट शिखरावर छत्रपतींचे सिंहासनारूढ स्मारक उभारण्यात आले आहे. नेपाळमधील एव्हरेस्ट समीटर्स असोसिएशनचे अध्यक्ष वंगचु शेर्पा यांच्या हस्ते या स्मारकाचे अनावरण करण्यात आले. एव्हरेस्ट फलकावर इंग्रजी, फ्रेंच, नेपाळी व जपानी अशा चार भाषांमध्ये छत्रपतींच्या शौर्याचा मजकूर लिहिला आहे. हे स्मारक जगातील प्रत्येक गिर्यारोहकासांठी प्रेरणा देत आहे.

**दक्षिण पूर्व आशियातील छोटासा देश व्हिएतनामने स्वातंत्र्यासाठी बलाढय अमेरिकेबरोबर २० वर्षे संघर्ष करून त्यात अमेरिकेचा पराभव केला. व्हिएतनामचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हो चि मिन्ह यांनी जगाला ओरडून सांगतले की आमच्या विजयाचे शिल्पकार आहेत. भारतातील श्रेष्ठ राजे छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या गनिमी कावा या युध्दतंत्राचा वापर करून आम्ही विजयी झालो. पुढे जाऊन ते म्हणतात, 'छत्रपती शिवाजी महाराज आमच्या देशात जन्माला आले असते तर आम्ही जगावर राज्य केले असते.'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या तीन दिवसांच्या युरोप दौऱ्यावर असताना प्रथम जर्मनी देशात पोहोचले. जर्मनीत त्यांनी चान्सलर शूल्ज यांची भेट घेतली. त्यावेळी जर्मन चॅन्सलर समोर म्हणजे जर्मन पंतप्रधानांच्या कार्यालयासमोर मराठी मंडळींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशात आणि ढोल ताशांच्या गजरात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत केले. ऑस्ट्रेलिया मध्ये छत्रपतींच्या विचाराच्या प्रसारासाठी शिवचरित्रातून राष्ट्रनिर्मिती हा कार्यक्रम संपन्न झाला. पर्थ, मेलबर्न, ब्रिस्बेन, सिडनी, ॲडिलेड, कॅनबेरा व ऑस्ट्रेलिया टाईमझोनशी जवळपास असणाऱ्या देशांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यूके, यूएसए, कॅनडा, न्यूझीलँड, सिंगापूर, मलेशिया, दुबई, अबूधाबी, नेदरलँड आणि मॉरिशस येथील नागरिकांना निमंत्रण देण्यात आले. ऑस्ट्रेलियामध्ये दरवर्षी शिवजयंती उत्सव मोठ्या थाटामाटामध्ये साजरा केली जाते. क्युबाचे राष्ट्राध्यक्ष फिडल कॅस्ट्रो म्हणतात 'अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राच्या विरुद्ध लढून आम्ही स्वतंत्र झालो ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीची प्रेरणा घेऊनच'.

जपानमधील लष्कर छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा अभ्यास करीत आहे. छत्रपतींची युद्धनीती समजून घेण्यासाठी ते महाराष्ट्रात आले व त्यांनी पन्हाळा किल्ल्याला भेट दिली. छत्रपतींच्या युद्धनीतीचा व स्थापत्यनितीचा त्यांनी अभ्यास केला. सैनिकांची संख्या बळ कमी असलेले देश तर सर्रासपणे छत्रपतींच्या गनिमी काव्याचा वापर करताना दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे गनिमी कावा हे युद्धतंत्र जगात श्रेष्ठ आहे . त्यांच्या युद्ध शैलीचा अभ्यास आज जगभरातील देश करत आहेत. त्यांचा नौदल, शौर्य, बुद्धिमत्ता, युद्धनीती, व्यवस्थापन, मानवतावाद याबाबतचा दृष्टिकोन अद्भूत आहे. आजही सर्व विश्वाला प्रेरणा देणारे महान राजे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना जगामध्ये सर्वश्रेष्ठ स्थान आहे.


- **डॉ. मधुकर जाधव,**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
ता. चंदगड जि. कोल्हापूर. ९९७५५४६०२०

# शिवाजी महाराज आणि मुस्लीम समाज

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव महाराष्ट्रात मोठ्या अभिमानाने आणि आदराने घेतले जाते. दरवर्षी १९ फेब्रुवारीला शिवजयंती राज्यभरात मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. ६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिनही साजरा केला जातो. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांनी हजारो लोकांच्या उपस्थितीत रायगड किल्ल्यावर राज्याभिषेक विधी पूर्ण केला होता. इतिहासात अनेक राजे, सम्राट होऊन गेले, ज्यांनी जनकल्याणाची कामे केली, ते लोक आजही स्मरणात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज सुद्धा असेच महान राज्यांपैकी सर्वोच्च फळीतील महान शासक होते, ज्यांनी समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत कोणताही भेदभाव न करता लोककल्याणाची कामे केली. त्यामुळे इतकी वर्षे उलटून गेल्यानंतरही लोक त्यांची आठवण ठेवतात.

**शिवाजी महाराज फक्त हिंदूंचेच राजे होते का?**

शिवाजी महाराजांना त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी हिंदू शासक म्हणून चित्रित केले जात आहे. शिवाजी महाराजांसारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वाला केवळ हिंदू धर्माच्या चौकटीतून पाहणे योग्य ठरेल का? शिवाजी महाराजांचे विशाल व्यक्तिमत्त्व केवळ धर्माचे रक्षक म्हणून मांडणे म्हणजे आपल्याच महापुरुषांचा मान कमी करण्यासारखे आहे. शिवाजी महाराजांचे जीवन सांगते की- त्यांनी आपल्या कारकिर्दीत उच्च आदर्श मांडला. संत, पीर औलिया तसेच सर्व धर्मांचा त्यांनी खऱ्या मनाने आदर केला. त्यामुळेच त्यांनी स्वराज्य स्थापन केले. तेव्हा स्थानिक मराठ्यांसह महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने मुस्लिमांनीही त्यांना साथ दिली. त्या काळात शिवाजी महाराजांच्या सैन्यात राहिलेल्या मराठ्यांना शिवाजीचे मावळे म्हणतात. या मावळ्यांमध्ये हजारो मुस्लिमांचाही सहभाग होता. त्यामुळे आजही कोल्हापूर, साताऱ्यातील मुस्लीम बांधव शिवाजी जयंतीच्या मिरवणुकित मोठ्या थाटामाटात सहभागी होतात.



शिवाजी महाराजांचे घराणे सुफी संतांचा खूप आदर करायचे. त्यांच्या आजोबांनी त्यांच्या दोन मुलांची नावे शाहजी आणि शरीफजी मुस्लीम पीर बाबा शाह शरीफ यांच्या नावावर ठेवली होती. खुद्द शिवाजी महाराजांना सुफी संत बाबा याकूत यांच्याबद्दल नितांत आदर असायचा. त्यांच्या काळात त्यांनी अनेक खानकांसाठी दिव्याची व्यवस्थाही केली होती. शिवरायांच्या काळात स्त्रियांना विशेष मान दिला जात असे. युद्धाच्या काळातही महिलांच्या स्वाभिमानाच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जात असे.

शिवाजी महाराजांचा आपल्या मुस्लीम सैनिकांवर अतूट विश्वास होता. शिवाजी महाराजांच्या प्रचंड सैन्यात ६० हजारांहून अधिक मुस्लीम सैनिक होते. त्यांनी एक मजबूत नौदलही स्थापन केले होते, या नौदलाची संपूर्ण कमान मुस्लीम सैनिकांच्या हाती होती. सागरी किल्ल्यांचे व्यवस्थापन बाग दोर दर्या सारंग, दौलत खान, इब्राहिम खान सिद्दी मिस्त्री यांसारख्या अनुभवी मुस्लीम गव्हर्नरांकडे सोपवण्यात आले होते. शिवाजी महाराजांचे औदार्य आणि कार्यशैली पाहून रुस्तमोजमान, हुसेन खान, कासम खान असे अनेक मुस्लीम सरदार विजापूर संस्थान सोडून सातशे पठाणांसह शिवाजी महाराजांना येऊन मिळाले. सिद्दी हिलाल हे शिवाजी महाराजांच्या जवळच्या सरदारांपैकी एक होते. सिद्दी हिलालने शिवाजीसोबत अनेक आघाड्यांवर आपले शौर्य दाखवले.

शिवाजी महाराजांच्या सैन्यात बहुतेक तोफखाना मुस्लीम सैनिकांचा असायचा. या तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम खान होता. तर शमाखान, इब्राहिमखान हे घोडदळाच्या तुकडीचे प्रमुख होते. सिद्दी इब्राहिम हा शिवरायांच्या खास अंगरक्षकांपैकी एक होता. अफझलखानाशी झालेल्या चकमकीत सिद्दी इब्राहिमने आपला जीव धोक्यात घालून शिवाजी महाराजांना वाचवले. पुढे शिवाजी महाराजांनी त्यांची फोंडा किल्ल्याचा प्रमुख म्हणून नियुक्ती केली. महाराज आणि त्यांचे मुस्लीम सहकारी यांचे एकमेकांशी घट्ट नाते असावे याची साक्ष सर्व तथ्ये देतात.

शिवाजी महाराज जेव्हा आग्रा किल्ल्यात नजरकैदेत होते, तेव्हा मदारी मेहतर नावाच्या मुस्लीम व्यक्तीने त्यांच्या तुरुंगातून पळून जाण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. जिवाची पर्वा न करता शिवाजी महाराजांचे रूप धारण करून ते निर्भयपणे शत्रूंच्या मध्ये जाऊन बसले. शिवाजी महाराजांनी आपल्या धर्मनिरपेक्ष भूमिकेने सर्वधर्मीय सहकाऱ्यांची मने जिंकली होती, म्हणूनच ते आपल्या राजासाठी प्राण द्यायला तयार झाले.

काझी हैदर हे पर्शियन भाषेचे अभ्यासक होते. शिवाजी महाराजांनी त्यांची वकील म्हणून नियुक्ती केली होती. प्रशासनातील पत्रव्यवहार आणि करार आणि गुप्त योजना यामध्ये त्यांचा मोठा वाटा असायचा. एकदा एका हिंदू सरदाराने काझी हैदरबद्दल शंका व्यक्त करून महाराजांना सावध राहण्याचा सल्ला दिला. त्यावर शिवाजी महाराज त्यांना लगेच म्हणाले, 'प्रामाणिकपणा कुणाची जात पाहून होत नाही, तो त्या व्यक्तीच्या कर्तृत्वावर अवलंबून असतो.'

- **मुख्तार खान.**
जनवादी लेखक संघ, मुंबई
(९८६७२१००५४)

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सोलापूर शहरात शिवजयंतीचा उत्साह; आज निघणार भव्य मिरवणुका

- मध्यरात्री रंगला पाळणा सोहळा
- जिजाऊच्या वेशभुषेत महिलांचा सहभाग

**सोलापूर** : शहरात शिवजयंतीचा मोठा उत्साह दिसून येत आहे. शिवप्रेमी १९ फेब्रुवारी रोजी निघणाऱ्या मिरवणुकीसाठी सज्ज झाले आहे. शहरात सर्वत्र भगवे वातावरण आहे. ठीक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची स्थापना केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवाजी महाराज चौकात रविवारी मोठा जनसागर उसळणार आहे. यंदाच्या शिवजयंतीच्या मिरवणुका मोठ्या भक्तमय वातावरणात काढल्या जाणार आहेत.मिरवणुकीमध्ये यंदा ४० मंडळे सहभागी होणार आहेत. या मिरवणुकीसाठी सरस्वती चौक ते सिद्धेश्वर मंदिरापर्यंत मोठ मोठे कंटेनर उभे केले आहेत. त्यांवर देखावा



उभा करून महाराजांच्या प्रतिमा बसवल्या आहेत. यंदा डॉल्बीला फाटा देत ढोल ताशा, लेझीम पारंपारीक वाद्यासह मिरवणुका निघणार आहेत. दरम्यान, शनिवारी रात्री उशिरा १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजन्मोत्सव महामंडळाच्या वतीने पाळणा झाला. या पाळणा सोहळ्यासाठी शहर जिल्ह्यातील तब्बल ५० हजारांच्या आसपास जिजाऊच्या वेशभूषेत महिला सहभागी झाल्या होत्या. शिवसेना जिल्हा प्रमुख अमोल शिंदे यांच्या शिवभोजनाचा अनेक शिवप्रेमींनी आस्वाद घेतला.

























## मोहोळ तालुक्यात ग्रामसुरक्षा यंत्रणेची जागरूकता मोहिम

**सुराज्य/मोहोळ** : आपत्कालीन स्थितीत ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या टोल-फ्री क्रमांकावर (१८००२७०३६००) फोन केल्यास एकाच वेळी गावातील सर्व नागरिकांशी संपर्क साधला जाईल. त्यातून इतरांना सावध करता येईल, तसेच मदतीसाठी बोलाविता येईल ही यंत्रणा ग्रामपंचायतीमार्फत गावात राबवली जाणार आहे. ग्रामसुरक्षा यंत्रणा ही ग्रामीण भागासाठी प्रभावी ठरेल. ग्रामसुरक्षा यंत्रणेमुळे चोरी व दरोड्यांना आळा बसू शकेल. पोलीस यंत्रणेस कायदा व सुव्यवस्था कायम राखणे कामे नागरिकांचे सहकार्य मिळते. प्रशासनाला नागरिकांशी जलद संपर्क साधता येतो. गावांमध्ये आपत्कालीन ग्रामसुरक्षा यंत्रणेविषयी जनजागृती करण्यात आली. तसेच ग्रामसुरक्षा यंत्रणेविषयीचे पुस्तकाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी ग्रामसुरक्षा यंत्रणेचे वरिष्ठ विभागीय अधिकारी गणेश लोकरे, मोहोळ तालुका पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद घुगे, संपर्क अधिकारी सतीश शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे, ग्रामसुरक्षा यंत्रणेचे वरिष्ठ विभागीय अधिकारी गणेश लोकरे, ग्रामपंचायत सदस्य रामदास चवरे, रजनीकांत चवरे, शिवसागर गायकवाड, युवा नेते रणजित चवरे, ग्रामविकास अधिकारी विश्वजित माने, बीट अंमलदार समाधान पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सिद्धेश्वर थोरात, तलाठी बी. एस. बेले, पोलीस पाटील तुकाराम कारंडे, सीताराम हेगडे आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी आदींसह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाथरी ते डोणगाव रस्त्यासाठी चार कोटींचा निधी मंजूर

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : मुख्यमंत्री सडक योजनेतून आमदार सुभाष देशमुख यांनी पाथरी - डोणगाव रस्त्यासाठी ३ कोटी ७५ लाख मंजूर करण्यात आल्याची माहिती उपसरपंच श्रीमंत बंडगर यांनी सांगितले आहे. पाथरी ते डोणगाव हा चार किलोमीटरचा रस्ता अनेक वर्षांपासून मातीचा असल्याने शेतकरी, विद्यार्थी ये-जा करण्यास त्रास सहन करावा लागत होता. रस्ता मजबुतीकरण डांबरीकरण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात आली होती. बाजार समितीचे तज्ञ संचालक पाथरीचे उपसरपंच श्रीमंत बंडगर यानी सतत पाठ पुरावा केल्याने आमदार सुभाष देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून ३ कोटी ७५ लाख निधी मंजूर झाले असून निधी मिळताच त्वरित पाथरी-डोणगाव रस्त्याचे काम चालू करण्यात येईल.

## मराठी गझलकारांनीही छ. शिवरायांचे गुणगान केले : डॉ. सांगोलकर

**सुराज्य/सांगोला**: छ. शिवरायांचे गुणगान शाहिरांनी तर केले आहेच परंतु मराठी गझलकारांनीही केलेले आहे मात्र, ते एकत्रित करून त्याची नीट समीक्षा आणि संशोधन होण्याची गरज आहे, असे उद्गार मराठी गझल संशोधक ज्येष्ठ गझलकार डॉ. अविनाश सांगोलकर यांनी काढले. ते सांगोला येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शिवजयंतीनिमित्त आयोजित 'अविनाश पासष्टी' हा गझल वाचनाचा कार्यक्रम सादर करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाअध्यक्ष बाबुराव गायकवाड तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे विश्वस्त एम. आर. गायकवाड उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अनिल कांबळे, सुभाष महिमकर, अरुण कांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रा. पी. सी. चव्हाण यांनी केले.

## ब्राह्मण सेवा संघाच्यावतीने कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर** : जुळे-सोलापूर ब्राह्मण सेवा संघातर्फे कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष डी. डी. कुलकर्णी, राघवेंद्राचार्य पद्मजा वझे यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निरुपणकार रत्नप्रभा सहस्त्रबुध्दे या होत्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते कर्तत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुध्दा चिमळगी, डॉ. मंजिरी कुलकर्णी, पद्मजा वझे, डॉ. संस्कृती वळसंगकर, अमरजा थिटे, कल्पना टंगसाळी, पल्लवी पैठणकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. फडणवीस व निरुपणकार सहस्त्रबुध्दे यांनी आपले विचार मांडले.

## दुष्काळ हटवण्याची क्षमता माण नदीत : घोंगडे

**सुराज्य/सोलापूर** : दुष्काळ हटवण्याची क्षमता आपल्या माण नदीत आहे तसेच ती बारमाही वाहू शकते मात्र, त्यासाठी लोक सहभाग महत्त्वाचा असल्याचे माण गंगा परिक्रमा व स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविणारे वैजनाथ घोंगडे यांनी सांगितले. 'चला, माण नदीला समजावून घेऊ या' या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. ही मुलाखत प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले आणि डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी घेतली. या प्रकट मुलाखतीचे आयोजन मराठी अभ्यास व संशोधन केंद्र आणि रोटरी क्लबच्या संयुक्त विद्यमाने सांगोला येथे करण्यात आले होते. प्रारंभी प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष इंजि. मधुकर कांबळे यांनी केले तर शेवटी रोटरी क्लबचे सचिव विकास देशपांडे यांनी आभार मानले. याप्रसंगी व्यवसायिक सुदाम मोरे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या चर्चेत रोटरीचे अध्यक्ष दत्तात्रय पांचाळ कवी प्रा. मुकुंद वलेकर यांनी सहभाग घेतला.

# सोलापूर विभागातील रेल्वेच्या समस्या सोडवाव्यात

- महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांना निवेदन दिले
- खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांची मागणी

सुराज्य/सोलापूर



**वंदे भारत रेल्वेच्या वेळेत बदल करा, प्लॅट फॉर्म क्रमांक ५ वर सुविधा वाढवाव्यात, टिकेकरवाडीला टर्मिनल स्टेशन मध्ये रुपांतर करा आदी मागण्यांचे निवेदन देत खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांना निवेदन दिले. सोलापूर विभागातील विविध समस्या सोडवून इतर विविध मागण्यांचे निवेदन देत प्रवाशांच्या सोयीसाठी सुरक्षेसाठी मागणी केली.**

नरेश लालवानी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांचा आयोजित सोलापूर विभाग भेट दौरा होता. या भेटीत दिलेल्या निवेदनानुसार, अक्कलकोट रोड स्टेशनवर कार्यरत असलेल्या पुलाचे काम वेळेच्या मर्यादेत जलद गतीने करण्याची मागणी केली झाले पाहिजे. विशेषतः वंदे भारत रेल्वे (२२२२५/२६) प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई ते सोलापूर, मुंबईतून सुटण्याची वेळ ४.१५ (१६.१५) ऐवजी ६ (१८) वाजता करावी. जेणे करून मुंबईतील काम उरकून प्रवाश्यांना रात्रीचा सोलापूरकडे असलेला प्रवास करणे सोईचे होईल. सोलापूर स्थानकावर पडणारा ताण लक्षात घेता टिकेकरवाडीला टर्मिनल स्टेशन मध्ये रुपांतर करण्यासाठी प्रशासनिक प्रयत्न व्हावेत. तसेच रेल्वे क्र. ०१३९७ सोलापूर - फलकनुमा पॅसेंजर लवकरात लवकर सुरू करावी. या विषयावर सिकंदराबाद विभागाला योग्य तो पाठपुरावा व्हावा. त्याचप्रमाणे रेल्वे क्र. ०१३९५ सोलापूर - विजापूर पॅसेंजर त्वरित सुरू करावी. रेल्वे क्र. १७३१९/२० हुबळी-हैदराबाद-हुबळी-सोलापूर गाडी होटगी थांब्याऐवजी सोलापूरपर्यंत वाढीव एक्स्टेंशन मिळावे. त्यामुळे सोलापूर शहरातील प्रवाशांना होटगी स्थानकावर उतरून पुन्हा सोलापूरकडे वेगळा प्रवास करावा लागत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून या गाडीस सोलापुरपर्यंत एक्स्टेंशन मिळण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे रेल्वे क्र. १९३०७/०८ बसवा एक्सप्रेस, रेल्वे क्र.१६३८२/८१ कन्याकुमारी एक्सप्रेस, रेल्वे क्र.१७३१९/२० हुबळी-हैदराबाद-हुबळी या गाड्यांना ट्रायल बेसवर अक्कलकोट रोड स्टेशनवर तीन महिन्यांकरिता थांबा द्यावा. पॅल्ट फॉर्म क्र. ५ (सोलापूर स्थानक येथे) लिफ्टची आवश्यकता आहे. अशा विविध मागण्यांकरिता खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी सोलापूर विभागातील प्रश्न सोडविण्यासाठी मागण्या केल्या. नरेश लालवानी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांनी या प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी सकारात्मकता दर्शविली.

## अक्कलकोटमधील अनुसूचित जाती घटकांच्या विकासासाठी ४ कोटी मंजूर

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी ४ कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.

या योजनेमध्ये घ्यावयाच्या कामांमध्ये वाढ करुन त्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच, सांस्कृतिक स्थळांचा विकास करणे, त्यांची स्मारके उभारणे व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा सांस्कृतिक विकास घडवून आणणे ज्यात वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र या कामांचा समावेश केला गेला आहे. त्यातून अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील नागणसुर १० लाख, समर्थनगर १० लाख, वळसंग ९ लाख, मुस्ती १० लाख, चपळगाव ९ लाख, रुद्देवाडी १० लाख, अरळी १० लाख, हन्नूर १० लाख, हन्नूर ५ लाख, किणी दोन कामे १२ लाख, नन्हेगांव दोन कामे १६ लाख, काझीकणबस१० लाख, बिजगेंर ८ लाख, आचेगाव१० लाख, सुलेरजवळगे १० लाख, केगांव बु.८ लाख, रामपूर १० लाख,



बक्षीहिप्परगे १० लाख, कुंभारी ७ लाख, दर्गनहळ्ळी ६ लाख, आलेगाव ८ लाख, तिल्हेहाळ ८ लाख, चिक्केहळ्ळी १० लाख, धारसंग १० लाख, गोगाव १० लाख, कोन्हाळी १० लाख, बागेहळ्ळी १० लाख,बबलाद १० लाख, कडबगाव १० लाख, कर्जाळ१० लाख, शिरवळ १० लाख, भुरीकवठे ८ लाख, संगदरी १० लाख, गळोरगी ८ लाख, तांदुळवाडी १० लाख, चुंगी १० लाख, कुरनुर ८ लाख, पितापूर १० लाख, सिन्नूर १० लाख, वागदरी १० लाख, दर्शनाळ १० लाख, बोरगाव १० लाख आदी कामांना निधी मंजूर झाला आहे.

## २५ लाखांसाठी विवाहितेचा छळ

**सुराज्य/सोलापूर**

तीन तोळे सोने व नवीन घर घेण्यासाठी माहेरून २५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणत विवाहितेला अपमानास्पद वागणूक देऊन मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत चारित्र्याविषयी बोलत नांदविण्यास नकार दिल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी काजल हुशार कांबळे (वय-२३, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती हुशार उत्तम कांबळे, सासू अनिषा उत्तम कांबळे, दीर तुषार उत्तम कांबळे, सासरे उत्तम रामचंद्र कांबळे, जाऊ पूजा तुषार कांबळे (सर्व रा. चेंबूर, मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक पाटील हे करीत आहेत.

**लोखंडी सळईने मारहाण**

फिर्यादी व फिर्यादी यांची मुलगी सविता कांबळे, जाऊ अनुसया गोरे असे तिघी घराबाहेर उभे असताना त्यांच्याच भागात राहणारे सिध्दू संदिपान सोनवणे व सहदेव संदिपान सोनवणे (दोघे रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) यांनी फिर्यादी समोर येऊन तुम्हांला जास्त मस्ती आली आहे का असे म्हणत फिर्यादी व त्यांची मुलगी तसेच जाऊ यांना मारहाण केली. त्यानंतर सिद्धू सोनवणे याने तेथेच पडलेल्या लोखंडी सळई हातात घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे. अशा आशयाची फिर्याद गंगुबाई पंढरी गोरे (वय-७०, रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सिद्धू सोनवणे व सहदेव सोनवणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो. हे. कॉ. ओहोळ करीत आहेत.

## बार्शीतील मेगा मॉल मधून दीड लाखांचा माल लंपास,

**सुराज्य/बार्शी** :येथील अलिपूर रस्त्यावरील मेगा मॉलमधून सेल्समॅन तसेच कामगारांनीच विश्वासघाताने दीड लाखांचा माल संगनमताने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. मॉलचे मालक संकेत अशोक गुंदेचा (रा.मिरगणे कॉम्प्लेक्स,बार्शी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

मेगा मॉलमधील सेल्सपर्सन हरिश गोदरा, देवेंद्रसिंग राजपुरोहित तसेच कामगार राकेश गोदरा, अनिल महेंद्रकुमार शर्मा रा.घडसीसर, चुरू, राजस्थान, दिपककुमार आसोपा रा.कालुबास बिकानेर, राजस्थान, अनिलकुमार महेंद्र जाट रा घडसीसर, चुरू राजस्थान, दिपक दाडिच, महिपाल अमरराम तेतरवाल, अशोक (पूर्ण नांव माहित नाही , सर्व रा. राजस्थान) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. दि. १७ जानेवारी ते ११ फेब्रुवारी रोजीच्या पहाटे ३ वाजेच्या दरम्यान सदर चोरीचा प्रकार घडला आहे. गुंदेचा यांचा अलिपूर रस्त्यावर कपड्याचा मेगा मॉल आहे. १७ जानेवारी रोजी संशयित आरोपी सेल्सपर्सन व कामगार म्हणून कामावर रूजू झाले. ते तेथेच मॉलच्या खोल्यामध्ये राहण्यास होते. ३१ जानेवारी राकेश गोदरा व दिपक दाडिच हे कामावरून न सांगता निघून गेले. त्यानंतर रोजी अनिल शर्मा हा देखील कामावरून निघून गेला. ८ रोजी संध्याकाळच्या सत्रामध्ये अनिल जाट हा मेगा मॉल मधून बाहेर पडत असताना मॉलसाठी लावलेल्या सिक्युरिटी मशीनमध्ये अलार्म वाजल्याने गुंदेचा यांनी त्यास अडवून त्याची तपासणी केली असता तो मॉलमधील टी शर्ट लपवून त्याच्या रूमवर घेवून जाण्याच्या प्रयत्नात होता. मॉलच्या उत्तरेकडील शॉपमधून देवेंद्रसिंग राजपुरोहित हा शॉपमधील मालाची पोती भरून घेवून जात असताना दिसून आला. त्यामुळे मॉलमधील मालाचा स्टॉक तपासणी करण्याकरिता मॉलमधील शॉपीचे कुलूप बदलल्याचे दिसले. स्टॉक तपासल्यानंतर मॉलमधील व शॉपीमधील माल चोरीस गेल्याचे दिसले.

## बेलाटी येथे भंडारा उत्सवास सुरूवात

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

**तालुक्यातील बेलाटी येथे सद्गुरू संत बाळूमामा मंदिर परिसरात शनिवार १८ फेब्रुवारीपासून सुरूवात झाली. सोमवार, २० फेब्रुवारीपर्यंत भंडारा उत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी दिली.**



शनिवार, १८ फेब्रुवारी रोजी सकाळी महाशिवरात्रीनिमित्त दिवसभर शिवभजन, आरती, महारूद्राभिषेक करण्यात आला. यावेळी भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. रविवार, १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, वृक्षारोपण कार्यक्रम व भजन, कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच सोमवार, २० फेब्रुवारी रोजी सोमवती अमावास्येनिमित्त सद्गुरू बाळूमामा मंदिरात पहाटे रूद्राभिषेक, काकडाआरती, भजन, कीर्तनचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता भंडारा उधळण्याचा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमानंतर भाविक-भक्तांसाठी महाप्रसाद वाटपाने भंडारा कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष पाटील-बेलाटीकर यांनी सांगितले आहेत.

## विवेकानंद स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे

**सुराज्य/सोलापूर** : सोलापुरातील विवेकानंद पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन सोहळा किर्लोस्कर सभागृहात उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य शंकर वडणे, शाळेच्या संचालिका संगीता सारडा, मुख्याध्यापिका सपना आसावा उपस्थित होते.

शाळेच्या परंपरेनुसार यंदाच्या वर्षी 'कम्युनिटी हेल्पर' या संकल्पनेवर आधारित सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्यावतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत संचालिका संगीता सारडा यांनी केले. मुख्याध्यापिका सपना आसावा यांनी शालेय वार्षिक अहवालाचे वाचन केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. यंदाच्या वर्षीची 'शायनिंग ऑफ द इयर' पुरस्काराची मानकरी स्वरा वानकर (युकेजी) ही ठरली.

## वडापुरातील श्री प्रभुलिंग यात्रेस आजपासून सुरूवात

**सुराज्य/सोलापूर** दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर गावातील श्री प्रभुलिंग यात्रेस आज पासून सुरूवात होणार आहे. १९ ते २१ फेब्रुवारी असे विविध कार्याक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील मंदिरासमोरील १६ एकर जागेत भगवान शंकराची २७ फुटी मूर्ती प्रतिष्ठापना केलेल्या मैदानात ११ पालख्यांचा भेटीचा सोहळा आणि मनोरंजनाची यात्रा देखिल भरली जाणार असल्याची माहिती यात्रा समितीचे प्रमुख अरूण पाटील यांनी दिली.

श्री प्रभुलिंग यात्रा कमिटी आणि श्री परमानंद देव ट्रस्टच्या वतीने ही यात्रा आयोजित केली जाते. ९ फेब्रुवारी पासून यात्रेस सुरूवात होणार आहे. यात्रे निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता वडापुर आणि मिरी ग्रामदैवत श्री प्रभुलिंग पालखी व नंदीध्वज व मानाच्या सवाद्य मिरवणूक गावातून मंदिरापर्यंत निघणार आहे. या मिरवणूकिमध्ये मानाचे नंदीध्वज, श्री महादेव काठी , श्री नरसिंह काठी, श्री विजयानगरी काठी, श्री मलुआई काठ्याचा सहभाग असणार आहे. तर सकाळ पासून रात्री महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. दुपारी चार वाजता बारोळच्या श्री पिंड बडीया, सिध्दापुरच्या श्री अमोगसिध्द, मंद्रुपच्या मळगालसिध्द, कुंभारीच्या श्री गेनसिध्द, सोरेगावच्या मलकारसिध्द, विंचूरच्या श्रीअमोगसिध्द सिध्दापूरचे भुताळसिध्द, जामगांवच्या खंडोबा, मिरी आणि वडापुरच्या प्रभुलिंग देवस्थानच्या भेटीचा अमृतभेटीचा सोहळा होणार आहे. त्यानंतर मिरवणूक रात्री ९वाजता ढालावरची गाण्याचा कार्यक्रम होणार आहे.

सोमवार २० फेब्रुवारी रोजी ग्रामस्थाचा नैवेध, महाप्रसाद, शोभेचे दारूकाम , रात्री घुंगरासाटी संसाराची माती मराठी नाटक होणार आहे. मंगळवार २१ फेब्रुवारी लेकिंचा नैवेध, महाप्रसाद, कर ताडणे, भव्य कुस्त्यांचे मैदान , रात्री सारेगामप ऑर्केस्ट्र होणार आहे.

### ११ पालख्यांचा रंगणार भेटीचा सोहळा

२५ एप्रिल रोजी १६ जागेत भगवान शंकराची मूर्ती प्रतिष्ठापना केली आहे. मूर्तीची उंची २७ फूट चबुतराची उंची २० फूट एकूण उंची ४७ फूट गोलाकार परिग १०० फूट आहे परिसरात चिंचची झाडे ,नारळाची झाडे ,वडाची झाडे - इतर प्रकारची वृक्ष लागवड केल्याने मंदिर परिसर पर्यटनाचे केंद्र बनले आहे.

## संत रोहिदास जयंती शिवगंगानगर येथे साजरी

**सोलापूर**: शिवगंगानगर भाग-५ पारशीविहिर, कुमठा नाका येथे संत गुरु रोहिदास महाराज बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने संत रोहिदास महाराज यांची जयंती कार्यक्रमास माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे, आप्पासाहेब बगले, अनिल बगले, संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण खाडे, अध्यक्ष संतोष कोरे, उपाध्यक्ष अभय इनामदार, निलेश मस्के, ऋषीकेश वाघमारे आदी उपस्थित होते.

## हिटर फुटल्याने उकळत्या पाण्याने महिला जखमी

**सोलापूर** : बोरामणी (ता.दक्षिण सोलापूर) विजेचा हिटर फुटून उकळते पाणी अंगावर पडल्याने सुमन शिवाजी माने (वय४०) ही महिला भाजून जखमी झाली. ही घटना शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.त्या प्लास्टिक हिटरचे बटन चुकून चालू ठेवले होते. पाणी तापून हा प्रकार घडला. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

# लोकमंगलच्या लोटस योजनेतून १३ विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

- मान्यवरांच्या हस्ते २ लाख ३५ हजारांच्या धनादेशाचे वितरण

**सुराज्य/सोलापूर**

लोकमंगल फाउंडेशन संचालित लोटस योजनेतून एकूण १३ दत्तक विद्यार्थांना २ लाख ३५ हजार आर्थिक मदत देण्यात आली. या मदतीच्या धनादेश वाटपाचा कार्यक्रम नुकतेच प्रमुख पाहुणे प्रफुल्ल पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवाजी पाटील, मोहन आलाट, प्रवीण ननवरे, डॉक्टर शिवराज सरतापे,



सुधीर ननवरे अंकुश आवताडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख मान्यवरांनी लोकमंगलच्या लोटस योजनेमुळे अनेक गरीब मुलांना उच्च शिक्षण घेण्यास मदत होत आहे. या योजनेचे अनुकरण सर्वांनी करण्यासारखे असल्याचे सांगितले.

समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देऊन त्यांचे आयुष्य शिक्षणाच्या मदतीने पुरविणे हे ध्येय समोर ठेवून आमदार सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून आणि रोहन देशमुख आणि मनीष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल ऑर्गनायझेशन फॉर टीचिंग अंडर प्रिव्हिलेज स्टुडंट्स (लोटस) ची वाटचाल २०१५ पासून आजतागायत सुरू आहे.

## घोडातांडा येथे दोन गटात मारहाण; महिलेसह चौघे जखमी

**सुराज्य/सोलापूर**

घोडातांडा (ता.दक्षिण सोलापूर) येथे मुलीला पळवून नेल्याच्या कारणावरून दोन गटात झालेल्या मारहाणीत महिलेसह चौघेजण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. सर्व जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

नवनाथ ठाकरु जाधव (वय३५ रा. घोडातांडा) असे जखमींचे नाव आहे. त्याचा मेव्हणा गावातील एका मुलीला पळवून नेला होता. त्या कारणावरून त्याची पत्नी घरात एकटी असताना किरण गेनु राठोड आणि २० ते २५ लोकांनी तिला मारहाण केली होती. त्याचा जाब विचारले असता काल सायंकाळच्या सुमारास रवी तुळशीराम राठोड, अनुसया राठोड, कमलाबाई राठोड, शोभा राठोड अशा १० ते १५ जणांनी मिळून त्याला लोखंडी पहार आणि रॉडने मारहाण केली. अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली.

दुसऱ्या गटातील किरण गेनू राठोड (वय ४०), पारूबाई देसू पवार (वय ४५) आणि विजय देसू पवार (वय २८ सर्व रा. घोडातांडा) अशी जखमींची नावे आहेत. गावात भांडण सुरू असताना ते सोडविण्यास गेले असता संतोष ठाकरु जाधव, नवनाथ जाधव आणि १० ते १५ लोकांनी मिळून लाथा बुक्क्याने मारहाण केली अशी नोंद पोलिसात झाली आहे.

# विविध धार्मिक उपक्रमांनी सोलापुरात महाशिवरात्री साजरी

## विविध मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील महादेव मंदिरात विविध धार्मिक उपक्रमांनी महाशिवरात्री साजरी करण्यात आली. अभिषेक, प्रसादवाटप, भजन, कीर्तन अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरांवर रोषणाई करण्यात आली होती. रात्री उशीरापर्यंत भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली.

शहरातील सिद्धेश्वर मंदिर, बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिर, अक्कलकोट रोडवरील एसव्हीसीएस प्रशालेतील मंदिरात कपिलसिद्ध मंदिर एमआयडीसी येथील विरतपस्वी मंदिर, दाजी पेठेतील नागनाथ मंदिर, विजापूर रोडवरील रेवणसिद्ध मंदिर, हत्तुरेवस्ती येथील महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. या प्रमुख महादेव मंदिरांमध्ये महाशिवरात्रीनिमित्त बेलपत्रांनी पूजा बांधण्यात आली. सकाळी अभिषेक करण्यात आले.







### कुडल येथे संगम आरत

**द. सोलापूरः** महाशिवरात्रीनिमित्त हत्तरसंग कुडल (दक्षिण सोलापूर) येथे नद्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शनिवार सायंकाळी संगम आरती आयोजित करण्यात आली होती.

यावेळी एपीआय मांजरे, डीवायएसपी श्रीशैल गजा, तर गंगापूजन एमके फौंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनुरे तर डॉ.अनिल हविनाळे यांच्या हस्ते नदीला नैवेद्य अर्पण करण्यात आले. संगमेश्वर मंदिरापासून ते संगम घाटापर्यंत संबळाच्या निनादात आरती आणण्यात आली. शनिवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सूर्यास्ताच्या वेळी काशीच्या धर्तीवर भीमा-सीना नद्यांच्या संगम घाटावर भक्तिमय वातावरणात संगम आरती करण्यात आली. पहाटेच्या सुमारास श्रींच्या मुर्तीस अभिषेक करण्यात आला. त्यानंतर जगातील एकमेव दुर्मिळ अशा बहुमुखी शिवलिंगाचा अभिषेक करून, पूजा करण्यात आली. भाविकांची पहाटे पाच वाजल्यापासूनच रांग लागली होती. बहुमुखी शिवलिंग, संगमेश्वरांचे शिवलिंग, पंचमुखी परमेश्वर शिवलिंगास बिल्वरचन पत्र अर्पण करून भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले.

## चिखलीत शिवजयंतीची जोरदार तयारी

✔ **चिखली** : मोहोळ तालुक्यातील चिखलीसह ग्रामीण भागात शिवजयंती निमित्ताने राजकिय पक्ष, सामाजिक संघटना तसेच शिवप्रेमींनी जोरदार तयारी केली आहे. शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



जागोजागी भगवा ध्वज लावण्यात आल्यान शिवजयंतीनिमित्ताने ग्रामीण भागातील वातावरण भगवामय झाले आहे. तसेच प्रत्येक गावागावात विद्युत रोषणाई करण्यात आली असून . शिवजयंती निमित्ताने विविध ठिकाणी दुकाने ही सजली आहेत. या दुकानांवर विविध आकारातील भगवे ध्वज, टीशर्ट, किचन, फोटो फ्रेम, टोपी असे विविध साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले असून, ते खरेदी करण्यासाठी नागरिकांमध्ये उत्साह पाहायला मिळतो आहे. तसेच अनेक दुचाकी , चारचाकी वाहनधारक यांनी आपापल्या वाहनांवर भव्य असे भगवे ध्वज लावले आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांची गुणवत्ता जोपासणार : आ.राऊत

✔ सुराज्य/बार्शी

### प्रत्येकी ८ लाख पन्नास हजारांना घरे मिळणार

बार्शी शहरात आजपर्यंत ५ हजाराहून अधिक घरे गरजुंना मिळावीत यासाठी नियोजन केले आहे. हि योजना सर्वअर्थाने यशस्वी ठरेल. ८ लाख ९४ हजार या घरांच्या एकूण किंमतीमधून ४४ हजार रूपये कमी करून शिवजयंतीच्या मुहर्तावरही घरे प्रत्येकी ८ लाख पन्नास हजार या किंमतीला उपलब्ध करून देणार असल्याची आमदार राऊत यांनी जाहिर केले.

प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांची गुणवत्ता जोपसणार असून गरजु बेघर बार्शीकरांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार राजेंद्र राऊत यांनी केले. बार्शी नगरपालिकेच्या वतीने धसपिंपळगाव रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेतील १५९६ घरकुलांच्या वसाहतीचे जिजाऊनगर नामकरण व नोंदणी कार्यालय शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी प्रवचनकार जयवंत बोधले महाराज, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, युनिटी मल्टीकॉन्सचे कफिल मौलवी, दानीश मौलवी, नगरअभियंता अजय होनखांबे, त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शनचे अजय चव्हाण व्यासपिठावर उपस्थित होते. यावेळी आमदार राऊत पुढे म्हणाले की, बार्शी नगरपालिकेच्या माध्यमातून पाच वर्षात अभुतपुर्व विकासकामे झाली आहेत. शहराला सिमेंट रस्ते, भगवंत स्टेडियम, व्यापार संकुले, भुयारी गटार योजना यासारखी सुविधा कामे मिळाली आहेत. गरजूंना घरे मिळावीत आणि ती मोठ्या अनुदान व सवलतींच्या माध्यमातून परवडणारी असावीत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हि योजना प्रभावीपणे राबविण्याचे धोरण आखले आहे. राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या योजनेला गती देत आहेत. यापुर्वीही आमच्या ताब्यात सत्ता असताना राऊत चाळींमध्ये वाल्मिकी, आंबेडकर, आवास योजना राबवली होती, असे सांगितले. यावेळी बोलताना प्रवचनकार बोधले महाराज म्हणाले राष्ट्रमाता जिजाऊ नगर या नामकरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मिळाल्यामुळे आमचे हात शुभ झाले आहेत. या योजनेतील घरांचा लाभ अतिशय सामान्य माणसाला होणार आहे. यावेळी प्रास्ताविकामध्ये आर्किटेक्ट अमोल मेहता यांनी या आवास योजनेत समाज मंदिर, पुर्व प्राथमिक शाळा या सारख्या सुविधा असून या योजनेत सर्व पायाभुत सुविधा चांगल्या प्रक़ारे उपलब्ध करून दिल्या जातील असे आश्वासन दिले. यावेळी अभियंता प्रकाश पाटील, मंदार कुलकर्णी, माजी नगरसेवक भारत पवार, संतोष बारंगुळे, दिपक राऊत, नवनाथ चांदणे, मराठा महासंघाचे अध्यक्ष किरण गाढवे आदी उपस्थित होते. निता देव यांनी सुत्रसंचालन केले.



# भाजप-शिंदे गटाचा मोहोळमध्ये निषेध

✔ सुराज्य/मोहोळ

मागील आठ माहिण्यापासून राज्यात शिवसेनेतून ४० आमदार निघून गेले त्यांनी भाजपा सोबत जावून डाव साधला. शिवसेना संपवण्याचा प्रकार केला आहे. हा लोकशाही संपवण्याचा प्रकार आहे, अशी प्रतिक्रीया शिवसेनेचे (ठाकरे गट) उपजिल्हा प्रमुख दादासाहेब पवार यांनी व्यक्त केली

निवडणूक आयोगाने शिवसेना या नावावर व धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर शिंदे गटाचा दावा मान्य केल्यानंतर मोहोळ येथील उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकानी भाजपासह शिंदे गटाचा निषेध व्यक्त केला. मोहोळ येथील शिवाजी चौकातील महाराजांच्या पुतळ्या पुतळ्या जवळ शनिवारी दुपारी शिवसैनिकांनी एकत्र येत पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून जोरदार घोषणाबाजी सुरु केली. यावेळी भारतीय जनता पार्टी व शिंदे ग ाचा निषेध व्यक्त केला यावेळी उपजिल्हा प्रमुख दादासाहेब पवार, अशोक भोसले, बाळासाहेब गायकवाड, बाळासाहेब वाघमोडे, सोमनाथ पवार, भागवत मुळे, नाना हावळे, दिलीप मोटे, विजय गायकवाड, प्रकाश पारवे, बुवा वाघमोडे, काकासाहेब खंदारे, संतोष चव्हाण, सदीप चवरे आदी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त शिक्षक पेन्शन प्रकरणास विलंब

✔ **सोलापूर** : जिल्ह्यातील १५० प्राथमिक शिक्षक येणार्या ३१ मेला सेवानिवृत्त होणार आहेत त्यांच्या सेवेतील मुदतवाढीचे प्रस्ताव दोन कारकुनाच्या टाळाटाळ मुळे पेन्शन प्रकरण सादर करण्यास विलंब होत असल्याचे तक्रार शिक्षक नेते शिवानंद भरले यांनी मुख्यकार्यकारी अधीकारी शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक व कर्मचार्यांनी वयाचे ५५ वर्षं पुर्ण झाल्यानंतर दरवर्षी सेवेत मुदतवाढ द्यावयाचे असते ५७ पूर्ण झालेल्या जिल्ह्यातील १५० शिक्षकांचे प्रस्ताव प्राथमिक शिक्षण विभागात पडून आहेत.

हे दोन कारकुनाच्या चार्ज देण्या घेण्याच्या वादात अडकले आहेत त्यामुळे या शिक्षकांचे पेन्शन प्रकरण सादर करण्यास विलंब होत आहे, असे भरले यांनी म्हटले आहे.

सुराज्य सोलापूर Classified

**नोकरी विषयक**

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१४०३२३)

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**

**जाहीर ई-निविदा क्र.१५ प्रसिद्धीकरण २०२२-२३**

**(अग्निशमन सेवा बळकटीकरण योजना)**

जा.क्र.२०२३/न.प.अ.कोट/अग्निशमन/संकलन-१/आरआर-/कावि-७४
दि.१७/०२/२०२३

मुख्याधिकारी नगरपरिषद अक्कलकोट हे अग्निशमन सेवा बळकटीकरण योजनेअंतर्गत उपकरणे खरेदी करणेकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत येत आहेत. अटी शर्तीसह सविस्तर निविदा सूचना, निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर दि.२०/०२/२०२३ ते दि.२७/०२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि.२७/०२/२०२३ रोजी ठिक ४ वाजेपर्यंत स्विकारण्यात येती. निविदापूर्व बैठक दि.२२/०२/२०२३ रोजी दु.३.०० वा. नगरपरिषद कार्यालय अक्कलकोट येथे आयोजित करणेत आलेली आहे. निविदा शक्य झाल्यास दि.२८/०२/२०२३ रोजी सायं.४.०० वा. उपस्थित मक्तेदार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
(सचिन पाटील)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद अक्कलकोट

महाराष्ट्र शासन | आझादी का अमृत महोत्सव | G20

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

**१९ फेब्रुवारी**



**॥ शिवरायांच्या सर्वसमावेशक राज्यकारभाराचा वारसा पुढे नेऊ या ॥**

**श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव**

किल्ले शिवनेरी येथे १८ ते २० फेब्रुवारी २०२३ या कालावधीत जन्मोत्सवाचे भव्य आयोजन

प्रमुख आकर्षण : 'महाशिवआरती', 'जाणता राजा' महानाट्य ● शिवकालीन गाव ● शिववंदना ● 'मराठी बाणा' कार्यक्रम ● स्थानिक पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रम ● महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिबीर ● स्पर्धा ● सहली ● कॅराव्हॅन पार्क ● बचतगटांची उत्पादने ● खाद्यपदार्थांची ३०० पेक्षा जास्त दालने

**लाल किल्ला, आग्रा येथे शिवजयंती कार्यक्रम**

● महाराष्ट्र शासन व अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आग्रा येथील लाल किल्ला परिसरात प्रथमच शिवजयंतीनिमित्त भव्य आयोजन ● शिवजन्माचे नाट्यरूप सादरीकरण ● महाराजांच्या आग्रा येथील पराक्रमाचे सादरीकरण यांसह विविध आकर्षक कार्यक्रम ● डिजीटल माध्यमांतून जगभरातील शिवप्रेमी अनुभवणार हा आनंदसोहळा, कार्यक्रमाचे आयोजन व प्रसारण - दि. १८ व १९ फेब्रुवारी २०२३

**राज्यगीताचा स्वीकृती सोहळा**

● छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून कविवर्य राजा बढे लिखित 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताचा 'राज्यगीत' म्हणून स्वीकृती सोहळा
● राज्यगीतीची लिंक https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध







**शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!**

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# शिवसेना भवनावर शिंदे गटाने केला दावा

सुराज्य/मुंबई

**शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाल्यानंतर मोठ्या राजकीय उलथापालथींना सुरुवात झालीय. केंद्रीय निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदेंच्या गटाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह दिल्यानंतर राज्यभरातील ठाकरे गटाच्या शिवसैनिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. शिवसेना पक्ष हा शिंदेंच्या ताब्यात गेल्यानं राज्यभरातील प्रत्येक जिल्हा, गावा-गावांतील शिवसेनेची कार्यालयं, तिथली प्रॉपर्टी एकनाथ शिंदे म्हणजेच शिवसेनेची होणार असल्याचं निश्चित मानलं जात आहे. विशेष म्हणजे शिंदे गट आता शिवसेना भवनावरही दावा करणार का? हाच प्रश्न सामान्य शिवसैनिकाला सतावतोय. कारण खरी शिवसेना ही शिंदेंची असल्याचा केंद्रीय निवडणूक आयोगानं निर्णय दिल्यामुळे शिवसेनेच्या मालकीची सगळीच मालमत्ता आता शिंदेंच्या मालकीची होणार असल्याचं बोललं जातंय.**

दुसरीकडे उद्धव ठाकरे गटाचे शिवसैनिक आता कोणत्या शाखेत किंवा जागेत जाऊन बसणार हाच प्रश्न ठाकरे गटाच्या शिवसैनिकाला पडू लागला आहे. खरं तर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीसुद्धा शिंदे गटाला याबाबत सूचक इशारा दिला आहे. शिवसेना भवनासह राज्यभरातील शिवसेनेच्या शाखा कोणाकडेही जाणार नाहीत. शिवसैनिक हे त्या शाखेतच बसतील. तिथेच बसून पक्षाचं काम पाहतील. उद्धव ठाकरे हेच आमचे सेनापती आहेत, असंही संजय राऊतांनी ठणकावून सांगितलंय. परंतु संजय राऊत असं बोलत असले तरी शिवसेना भवन शिंदे गटाला मिळणार का प्रश्न अनुत्तरितच आहे.

शिवसेना भवनावरील बाळासाहेबांचा फोटो, भगवा झेंडा आणि शिवसेना शाखा अजूनही शिवसैनिकांसाठी ऊर्जेचा स्रोत आहे. शिवसेनेच्या शाखेतूनच अनेक नेते नगरसेवक, आमदार आणि खासदार झालेत.



परंतु आता शिवसेना भवनासह शाखा शिंदे गट ताब्यात घेण्याच्या तयारीत असल्यानं ठाकरे गटाच्या शिवसैनिकांत प्रचंड असंतोष आहे. आता राज्यातील सगळ्या शिवसेनेच्या शाखा हा एकनाथ शिंदे गट बळकावणार असल्याचं निश्चित मानलं जात आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदेंना दिल्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयातही आपला दावा मजबूत करण्यासाठी शिंदेंना राज्यातील सर्व शिवसेनेच्या शाखा ताब्यात घ्याव्या लागणार आहेत.

खरं तर शिवसेना भवन आणि राज्यभरातील शिवसेनेच्या शाखा नियंत्रणात घेण्यावरून ठाकरे आणि शिंदे गटात हिंसक झटापट होण्याची शक्यता आहे. परंतु शिवसेना भवन हे शिंदे गटाला ताब्यात घेता येणार नाही. कारण त्या इमारतीची मालकी ही शिवाई ट्रस्टकडे आहे आणि शिवाई ट्रस्ट ही शिवसेना पक्षाच्या मालकीची नाही. शिवसेना भवनची इमारत ही शिवसेना पक्षाच्या नावावर नाही. त्यामुळे साहजिकच ती अधिकृतरीत्या पक्षाच्या मालकीची नसल्यानं उद्धव ठाकरेंच्या ताब्यात जाण्याची शक्यता आहे. तसेच शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनाची छपाई ही प्रबोधन प्रकाशनाच्या माध्यमातून केली जाते. त्यामुळे त्याचाही शिवसेना पक्षाशी थेट असा कोणताच संबंध नाही. राज्यात शिवसेनेच्या शाखा वेगवेगळ्या नावांवर आहेत. तसेच ज्या कोणाच्याही नावांवर नाहीत, त्या शाखांवर शिवसेना पक्ष म्हणजेच शिंदे गट दावा करणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालानंतर शाखा ताब्यात घेण्यावरून कोकणात शिंदे गट आणि ठाकरे गटाच्या शिवसैनिकांमध्ये वादावादी झालीय. तशाच प्रकारची वादावादी राज्यातील इतर भागांमध्येही झाल्यास आश्चर्य वाटण्याचं कारण नाही.

### अधिकार कुणाचा?

मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या शिवसेना कोणाची या वादावर केंद्रीय निवडणूक आयोगाने अखेर निर्णय दिला. आयोगाच्या या निर्णयानुसार आता शिवसेना या पक्षनावावर आणि धनुष्यबाण या पक्षचिन्हावर शिंदे गटाचा अधिकार असणार आहे. मात्र, यानंतर वाद संपलेला नसून शिवसेनेचे कार्यालय, देणग्या, संपत्ती, निधी यावर कोणाची मालकी असा नवा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत ज्येष्ठ कायदातज्ज्ञ श्रीहरी अणे यांना विचारलं असता त्यांनी कायदेशीर बाजू स्पष्ट केल्या. श्रीहरी अणे म्हणाले, 'शवसेनेकडे पक्षनिधी आहे. याशिवाय संपत्ती, संस्था, कार्यालयं, शाखा आहेत. त्यावर कोणाचा हक्क याकडे न्यायालय अगदी वेगळ्याप्रकारे पाहतं. सामान्य लोकं त्याकडे भावनिकपणे पाहतात. त्याचं मोठं उदाहरण म्हणजे बाबरी मशीद खटला. सर्वोच्च न्यायालयाने ते प्रकरण हिंदू-मुस्लीम, त्यांचा इतिहासकाऱ्यांचा इतिहास असं न हाताळता संपत्तीविषयक प्रकरण म्हणून याकडे पाहिलं. तसेच त्या जमिनीचे मालक कोण याप्रमाणे निकाल दिला.'

---



## बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी अशोक लुणावत यांची निवड

**सुराज्य/सोलापूर** : सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या सन २०२२-२३ ते २०२७-२८ सालासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड-निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. अध्यक्षपदी अशोक लुणावत व उपाध्यक्षपदी प्रकाश वाले यांची एकमताने निवड करण्यात आली. लुणावत यांचे नाव राजगोपाल मिणीयार यांनी सुचविले व अनुमोदक कल्याणराव काळे यांनी दिले. उपाध्यक्ष वाले यांचे नाव किसन माळी यांनी सुचविले व राजगोपाल झंवर यांनी अनुमोदन दिले. नूतन अध्यक्ष अशोक लुणावत यांनी बँक्स असोसिएशनच्या संचालकांचे आभार मानून बँक्स असोसिएशनच्या प्रगतीकामी सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी नूतन संचालक मंडळ राजगोपाल झंवर, राजगोपाल मिणीवार, शंकर पाटील, दिपक मुनोत, डॉ. अशोक सुरवसे, किसन माळी, कल्याणराव काळे, संगीता फाटे, अस्मिता गायकवाड व प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे आदी उपस्थित होते.

## मुलाच्या खुनाच्या आरोपातून वडिलांची निर्दोष मुक्तता

सुराज्य/बार्शी

मुलाच्या खुनाच्या आरोपातून वडिलांची बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. डी. अग्रवाल यांनी निर्दोष मुक्तता केली. दि. १४ जुलै २०१९ रोजी (पोपट जगदाळे वय-३५ वर्षे) यांनी राहत्या घरी गळफास घेतल्यामुळे मयत अवस्थेत जगदाळे माम हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल करण्यात आले होते.

पोपट जगदाळे हा दारू पिऊन घरातील सर्व माणसांना मारहाण करीत असे म्हणून त्याचे वडील चंद्रकांत जगदाळे यांच्यावर स्वत:च्या मुलाचा खून केल्याचा आणि गळफास घेतल्याचा बनाव केल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवण्यात आला. खटल्याची सुनावणी ही अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. डी. अग्रवाल यांच्यासमोर झाली.

आरोपीविरूध्द एकही सबळ पुरावा आढळून आला नाही. ॲड. महेश जगताप यांनी आरोपीतर्फे केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून यातील आरोपीस न्यायालयाने निर्दोष ठरविले. याकामी सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप बोचरे तर आरोपीतर्फे ॲड. महेश जगताप, ॲड. राहुल कसबे, ॲड. अभिजीत जगताप, ॲड. वंदना यादव यांनी काम पाहिले.

## अर्धनारी नटेश्वराला भक्तीभावाने रुद्राभिषेक

सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथील श्री अर्धनारीनटेश्वर मंदिरात पहाटे ४ वाजता श्री शिवपार्वती मुर्तीस जलाभिषेक घालण्यात आला बेल पान फुलाची पूजा बांधण्यात आली व पोशाख करण्यात आला.

यानंतर महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते 'श्रीं' ची पूजा करण्यात आली व सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते अर्धनारी नटेश्वराची पूजा व आरती करण्यात आली तसेच अर्धनारी नटेश्वरास माढा खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते रुद्रा अभिषेक घालण्यात आला. महाशिवरात्रीनिमित्त श्री महादेव देवालय देवस्थान ट्रस्टच्यावतीने शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर महाराज व सद्गुरु शिवराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष बिल्वार्चन सोहळा, अभिषेक व महासत्संग सोहळा आयोजित करण्यात



आला होता. सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते श्री अर्धनारी नटेश्वराची पूजा व आरती करण्यात आली .

यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर , सातारा जिल्हा शिवसेनाप्रमुख विराज काकडे, सद्गुरु साखर कारखान्याचे चेअरमन एन. शेषागिरीराव, महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, पांडुरंग माने-देशमुख भाजपा तालुका उपाध्यक्ष व वेळापूर सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, हरिभाऊ माने देशमुख शेतकरी संघटनेचे कमलाकर माने देशमुख, धनंजय माने -देशमुख, दीपक राऊत, नितीन चौगुले, विराज माने-देशमुख यांच्यासह असंख्य भाविक उपस्थित होते.

भाविकांनी दिवसभर शिवपार्वतीस अभिषेक घातले. महेश गुरव, जगदीश गुरव, योगेश गुरव, विवेक जोशी, मन्मथ स्वामी, महेश स्वामी यांनी पौरोहित्य केले. वेळापूर व परिसरातील स्थानिक भजनी मंडळांनी संगीतमय भजन कार्यक्रम सादर केला. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## देवळाली येथे कोयत्याने मारहाण पती-पत्नी जखमी

सुराज्य/करमाळा

देवळाली (ता. करमाळा) येथे दारूच्या नशेत दरवाजा तोडून कोयता आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत शहाजी महादेव बोराडे (वय ३८) आणि त्यांची पत्नी शितल बोराडे




हे दोघे जखमी झाले.

ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. शिवाजी गणेशकर त्याचा मुलगा रवी गणेशकर आणि अन्य दोघां महिलांनी मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




## संत सेवालाल जयंती मार्केट यार्डात साजरी

**सुराज्य/सोलापूर** : बोरामणी मतदारसंघातील सर्व बंजारा समाज एकत्र येऊन उमाकांत राठोड प्रतिष्ठानच्यावतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती हैदराबाद रोडवरील मार्केटयार्ड जवळ मूर्ती प्रतिष्ठापना करून साजरी करण्यात आली.

यावेळी भाऊ महाराज उमरीगड, बाळासाहेब शेळके, श्रीशैल नरोळे, बाळासाहेब वायमारे, विश्रांत गायकवाड, मफ्फू जमादर, प्रकाश राठोड याच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मुळेगाव तांड्याचे सरपंच विजय उमाकांत राठोड, उत्सव समितीचे अध्यक्ष रमेश चव्हाण, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, रतीलाल राठोड, राजकुमार राठोड, कार्याध्यक्ष अंकुश राठोड, सचिव तारसिंग राठोड, खजिनदार प्रकाश राठोड, सहखजिनदार विश्वनाथ राठोड, पिंटू राठोड, सल्लागार अनिल राठोड, संपर्क प्रमुख राम पवार, सदस्य श्रीकांत राठोड, शिवाजी चव्हाण, बाबू चव्हाण, नागनाथ जाधव, मनोज राठोड, शेवू पुढारी, दगडू राठोड, शाम जाधव, गणपत राठोड, तोळाराम नाईक आदी उपस्थित होते.

## नागसेन वानखेडे यांनी पदभार स्वीकारला



**सुराज्य/सोलापूर** : नागसेन वानखेडे यांनी महापारेषणच्या मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) या पदाचा पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते IBM², LT इन्फोटेक, ऊर्जा मंत्रालय, यूके, जर्मनी, यूएस, कॅनडा आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये ५ वर्षांपेक्षा जास्त विविध पदावर काम केलेले आहे. त्यांना व्यवस्थापन, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट्स, कन्सल्टिंग, SP एंटरप्राइझ आर्किटेक्ट, एकात्मता डिझाइन आणि अंमलबजावणी, आयटी ऑपरेशन्ससाठी ऑटोमेशन, सायबरसुरक्षा, क्लाउड सोल्युशन्स आणि व्यवसाय वाढवणारे डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन प्रदान करण्यात तज्ज्ञ असा एकूण १८ वर्षांचा त्यांना अनुभव आहे. त्यांनी औरंगाबादच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण झाले आहे. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता अभियांत्रिकी आणि डेटा सायन्समध्ये ड्युअल मास्टर्स पूर्ण केले आहेत. त्यांनी एसएपी, डिझाइन थिंकिंग, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन्स, नेटवर्क्स, सिक्युरिटी आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट इत्यादी विविध व्यावसायिक प्रमाणपत्रे प्राप्त केली आहेत.

## कस्तुराबाई हसापुरे यांचे निधन



**सुराज्य/सोलापूर** : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सुरेश हसापुरे व सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा संघटक रमेश हसापुरे यांचे मातोश्री कै. कस्तुराबाई सिद्रामप्पा हसापुरे यांचे शनिवारी निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा निंबर्गी गावातून रविवारी सकाळी ११ वाजता निघणार आहे.

## प्रवीण माने यांचे निधन



**सुराज्य/अक्कलकोट**: तालुक्यातील शिरवळचे सुपुत्र कै. प्रवीण अंकुश माने यांचे हृदयविकाराने निधन झाले. ते बँक ऑफ बडोदा येथे कृषी अधिकारी म्हणून रुजू होते. मुंबईहून सुट्टीनिमित्त गावी येताना सोलापुरात १८ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक वर्षाची मुलगी, बहीण असा परिवार आहे.

## रेल्वे मंत्रालयाकडून प्रवाशांना आकर्षक भेट : कांबळे

सुराज्य/सोलापूर

**मुंबई प्रवास सुखकर आणि गतिमान व्हावा याकरिता रेल्वे मंत्रालयाने महाराष्ट्र राज्याला आधुनिक पद्धतीची 'वंदे भारत' रेल्वेच्या स्वरूपात आकर्षक भेट प्रदान केली आहे. या रेल्वेगाडीमधून नागरिकांनी प्रवास करावा, असे रेल्वे विभागीय वाणिज्य निरीक्षक गणेश कांबळे यांनी आवाहन केले आहे.**

शनिवारी कुर्डूवाडी रेल्वे स्टेशन प्रबंधक यांच्या कार्यालयामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व सोयी युक्त असणारी 'वंदे भारत' सुपरफास्ट रेल्वेला सोलापूर-मुंबईचा ६ तास ३० मिनिटाचा गतिमान प्रवास असल्यामुळे जवळपास




दीड तासाचा कालावधीची बचत होणार आहे.

सुपरफास्ट वंदे भारत रेल्वेमुळे सोलापूर, अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर, आळंदी या तीर्थक्षेत्रांचे दर्शन सुलभ होणार आहे. त्याचबरोबर पर्यटन स्थळांना आणि व्यापाराला चालना मिळणार आहे. सुपरफास्ट रेल्वेमध्ये मोफत वाय-फाय, झोपण्यायोग्य आसन, चार्जिंग पॉइंट, टच फ्री बायो व्हॅक्युम टॉयलेट, चालक दलाशी संवाद साधण्यास आपत्कालीन टॉप बँक विभाग, वातानुकूलित प्रणाली, भोजन नाष्टा यांची सुविधा आहेत. या रेल्वेतून प्रवास करण्याकरिता प्रवासापूर्वी अर्ध्या तासामध्ये रेल चार्ट या ॲपवर तिकिट बुकिंगची सुविधा रेल्वेकडून उपलब्ध करण्यात आलेली आहे. व्यापारी नोकरदार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांनी या आरामदायी सुपरफास्ट रेल्वेचा अधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे विभागाच्या वरिष्ठांकडून करण्यात आले.

यावेळी मुख्य वाणिज्य निरीक्षक आर. एस भानवसे, स्टेशन प्रबंधक जानराव, पार्सल पर्यवेक्षक रहीम शेख, माल परिवेक्षक धम्मदीप ओहोळ यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होते.



## दुकानात सापडलेले पैसे कामगाराने केले परत

सुराज्य/चिखली

मोहोळ येथील एका इलेक्ट्रिक दुकानातील कामगाराला दुकानात साफसफाई करताना सापडलेले ६ हजार चारशे रुपये आणि महत्वाची कागदपत्रे आपल्या दुकान मालकामार्फत मूळ ग्राहकांकडे दिल्याने कामगाराचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

मोहोळ शहरात मेन रोडवरील सूरज इलेक्ट्रिक नावाचे आदर्श चौकात इलेक्ट्रिकल दुकान असून या दुकानात सूरज परमार हा कामगार कामाला आहे. त्याला काम करताना एका ग्राहकाचे सहा हजार चारशे रुपये पडल्याचे दिसले. त्याने याची माहिती दुकानाचे मालक शशी निकम यांना सांगून ते पैसे त्यांच्याकडे सुपूर्द केले. ते पैसे विलास म्हमाणे नामक व्यक्तीचे होते. ते पैसे शोधत सूरज इलेक्ट्रिक दुकानात आले. त्यावेळी मालकाने त्यांना पैसे आणि कागदपत्रे परत केली. म्हमाणे यांनी त्या कामगाराला बक्षीस देण्याची इच्छा दर्शविली परंतु त्यांनी ते नाकारले. म्हमाणे यांच्या इमानदारीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## खा. निंबाळकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करा

**सुराज्य/निमगाव** : १९ फेब्रुवारी हा माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा वाढदिवस आहे. मात्र ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असल्याने माढा लोकसभेचे खा. निंबाळकर हे त्यांच्याबरोबर कोल्हापूर येथे असणार आहेत.त्यामुळे कार्यकर्ते पदाधिकारी व जनतेने शुभेच्छा देण्यासाठी येऊ नये, त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करावा,



असे आवाहन सातारा जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे यांनी केले आहे. खा. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा वाढदिवस सेवा दिन म्हणून साजरा करावा व त्यानिमित्त गोरगरीब जनतेस फळेवाटप, रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम यासारख्या विविध कार्यक्रमांनी साजरा करावा, असे आवाहन भाजपचे सातारा जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे यांनी केले आहे.

## विवाहितेचा छळ ; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

विवाहितेला तिच्या पतीच्या निधनानंतर सासरकडील मंडळींनी छळ करत घरातून हाकलून दिले आहे. अशा आशयाची फिर्याद गोविदम्मा म्हेत्रे (वय-३२, रा. जांबमुनी नगर, सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. सासू मरेम्मा नरसिंग म्हेत्रे, (रा. आंबेडकर नगर, शिक्षक सोसायटी), नणंद सुनीता हुल्ले, चुलत नणंद चिन्नू वाघमारे (रा. लष्कर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## घरातून तीन लाखांची रोख रक्कम लंपास


सुराज्य/सोलापूर

संतोष विजयकृष्णा कुलकर्णी (वय-५०, रा. पेलिकन बिल्डिंग, इंद्रधनु मंगळवेढा रोड, सोलापूर) यांच्या घरातील कपाटात ठेवलेली तीन लाखांची रोख रक्कम मुख्य दरवाजाचे व आतील बेडरूमचे कडीकोंडा तोडून लंपास केली.ही घटना दि. ३० डिसेंबर २०२२ ते ५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान सानवी अपार्टमेंट द्वारकाधीश मंदिरासमोर सोलापूर येथे घडली. याप्रकरणी संतोष कुलकर्णी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अर्चित चव्हाण, विवेक मोटगी, अमित भरडे, राजश्री (पूर्ण नाव माहित नाही) देशमुख (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

**चोरट्याने फोडले घर**

राहत्या घराला कुलूप लावून परगावी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाज्याला लावलेले कुलूप तोडून आत प्रवेश करत घरातील आठ ग्रॅम सोन्याचे कानातील फुले व दोन ग्रॅम नाकातील सोन्याची नथ तसेच रोख रक्कम असा एकूण ३४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान ओमसाई रेसिडेन्सी भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी मिथुन बसवराज पाटील (वय-३४, रा. ओम साई रेसिडेन्सी, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई ताकभाते हे करीत आहेत.

**साहित्य पळवले**





काम चालू असलेल्या ठिकाणाहून पोकलेन क्रमांक एस. वाय. २०१० सी-९ व त्याचा नंबर १९ एस ई वाय आय ए ८०५१ येथे फिर्यादी अमोल नवनाथ डिकरे (वय-३९,रा. मु. पो. हिरवे, ता. मोहोळ) यांचे काम चालू असताना संशयित आरोपी विजयकुमार दयाराम (रा. उत्तर प्रदेश) याने १ लाख ८८ हजार रुपये किमतीचे एक मॉनिटर,सात रिले काळ्या रंगाचे प्लग, दोन एसी इंजेक्टर, पोकलेन मशीनचे बकेटचे बुश) असा मुद्देमाल चोरून नेला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली असून घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

**हायवा टिप्परची मोटारसायकलीला धडक**

शिवाजीनगर बाळे येथून शिवाजीनगर ते केगावकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवरून फिर्यादी हे आपल्या मोटरसायकल क्र.एम.एच.१३. डी.यु.५५६५ जात असताना हायवा टिप्पर क्र.एम.एच.१२.क्यू. डब्लू.८३९३ चा चालक याने भरधाव वेगात व निष्काळजीपणाने हायवा टिप्पर चालवून फिर्यादी यांच्या मोटारसायकलीला धडक देऊन अपघात करत गंभीर दुखापत केली आहे. तसेच फिर्यादी यांना उपचाराकरिता घेऊन न जाता व अपघाताची खबर न देता टिप्पर जागेवर सोडून पळून गेला आहे, अशा आशयाची फिर्याद शेखर उत्तरेश्वर माडिवाळ (वय-३२, रा. मु. पो. नान्नज, ता. उत्तर सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून हायवा टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.



# शिवसेना

## काल... आज... उद्या?

**स्व. बाळासाहेब ठाकरे. ज्वलंत हिंदुत्वाचा धगधगता निखारा. मुंबईतील मराठी माणसाचा मानबिंदू. कुंचल्याच्या फटकाऱ्यातून भल्याभल्यांचा पळता भूई थोडी करणारा जितका मिस्कील तितकाच जहाल व्यंगचित्रकार. एकीकडे कुंचल्याचा फटका आणि दुसरीकडे शब्दांचा तडाखा असा तुफान सपाटा सुरू असलेला एक मंतरलेला काळ. जेवढी ताकद कुंचल्यात होती; किंबहुना त्यांच्याजवळ होती ती काळ्या पाषाणालाही उभा-आडवा चिरणाऱ्या शब्दांची ताकद. त्यामुळे झाले काय? तर मुंबईतील मराठी लोक बाळासाहेब नावाच्या अफलातून रसायनाजवळ येऊ लागले. बाळासाहेब त्यांच्यासाठी हक्काचे व्यासपीठ बनले. बाळासाहेब त्यांच्यासाठी हक्काचा मराठी माणूस बनले. हाच मराठी माणूस एक एक करत ते जोडत गेले, संघटन तयार होत गेले आणि शिवसेना नावाच्या संघटनेची जन्म झाला. तीच ती हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना. फक्त १८ लोकांच्या उपस्थितीत नारळ फोडून मुंबईतील एका छोट्याशा इलाख्यात सुरू झालेली शिवसेना पुढे जाऊन महाराष्ट्रात सत्तेवर आली. तीच शिवसेना; गेल्या आठ महिन्यांपूर्वी बंड झाले आणि शिवसेना फुटली. शिवसेनेचा मुख्यमंत्री सत्तेवरून पायउतार झाला. ती तीच शिवसेना, जी निवडणूक आयोगाने बंडाचे प्रणेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बहाल केली.**

शिवसेना आणि ठाकरे हे समीकरण गेल्या ५६ वर्षात कधीही तुटले नव्हते. तशी शिवसेनेने अनेक वादळे पाहिली. अनेक चढ-उतार अनुभवले. शिवसेनेत किती आले आणि गेले. शिवसेना संपवण्याची भाषा करणारे बाळासाहेबांच्याच हयातीत अनेकजण संपले. अनेक संकटे आली. तरी एखाद्या पहाडासारखे बाळासाहेब अटल राहिले आणि शिवसेनेला अभेद्य ठेवले. शिवसेना संपवण्याची भाषा करणाऱ्यांनाच शिवसेनेच्या बाणाने भेदले. बाळासाहेबांचा शब्द म्हणजे आदेश. बाळासाहेबांचा आदेश म्हणजे कायदा. बाळासाहेब बोलले म्हणजे कोणत्याही परिस्थितीत माघार नाहीच. विचार करून बोलणार नव्हे तर बोलल्यानंतर अनेकांना विचार करायला लावणारा नेता म्हणजे बाळासाहेब. प्रसंगी कशाचीही पर्वा न करता निर्णय घ्यायचे आणि निर्णय घेतल्यानंतर ते कधीही कशाचीही पर्वा करायचे नाहीत. बाळासाहेबांचा दराराच इतका प्रचंड की त्यांच्यासमोर दिल्लीश्वर कधीच वर मान करून बोलले नाहीत. बाळासाहेब पाठीशी असल्यानंतर दिल्लीश्वर कुणासमोरही झुकले नाहीत. काल त्याच बाळासाहेबांच्या पश्चात त्यांच्याच शिवसेनेत बंड झाले आणि आज ठाकरे व शिवसेना हे अतूट समीकरण पहिल्यांदाच तुटले.

### शिवसेनेला जन्म देणाऱ्या 'मार्मिक'चा जन्म





बाळासाहेब हे हाडाचे व्यंगचित्रकार. त्यांच्या कुंचल्यात विलक्षण ताकद होती. त्यांच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यातूनच मी मी म्हणणारे अक्षरश: घायाळ होत. केवळ व्यंगचित्राला वाहिलेले एक वृत्तपत्र असावे, या विचाराने बाळासाहेबांनी १९६० साली मुंबईमध्ये एक साप्ताहिक सुरू केले. त्याचेच नाव 'मार्मिक' असे ठेवले. त्या दरम्यान संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली होती. मराठी माणसांच्या प्रश्नांवर बाळासाहेबांची व्यंगचित्रे जोरदार प्रहार करत होती. मुंबईतील मराठी माणसांवर अन्याय चालू होता. त्या अन्यायाला 'मार्मिक'ने वाचा फोडली. 'मार्मिक'मुळे खऱ्या अर्थाने बाळासाहेबांचे संघटन सुरू झाले. त्याच संघटनातून पुढे शिवसेनेचा जन्म झाला.

### वाचा आणि थंड बसा

बाळासाहेब जसे ख्यातीचे व्यंगचित्रकार तसे हाडाचे पत्रकारही होते. शिवाय ते फर्डे वक्तेही होते. भाषणाची त्यांची स्वत:ची अशी एक ठाकरी शैली होती. 'मार्मिक'मधील अणकुचीदार कुंचला आणि धारदार लेखी, मोकळ्या मैदानातील सभांमध्ये बरसणारी वादळी ठाकरी शैली यामुळे मराठी माणूस बाळासाहेबांभोवती गोळा होऊ लागला. 'मार्मिक'चे कार्यालय बाळासाहेबांचे घर म्हणजे मराठी माणसांची पंढरी बनले. त्याकाळी बाळासाहेबांनी सुरू केलेले 'मार्मिक'मधील 'वाचा आणि थंड बसा' हे सदर मुंबईमध्ये धुमाकूळ घालत होते. त्यातून बाळासाहेबांभोवती गोळा झालेल्या मराठी माणसांचे संघटन करण्यासाठी एका संघटनेची गरज होती. तशी ती अनेकांनी बोलूनही दाखवली होती. खुद्द प्रबोधनकार ठाकरेंनीसुध्दा बाळासाहेबांना मराठी माणसांची संघटना काढण्याचे सुचवले होते. तिथूनच शिवसेनेच्या स्थापनेची वाटचाल सुरू झाली.



### शिवाजीची सेना... शिवसेना



बाळासाहेबांना बहुतांश लोकांनी राजकीय पक्ष स्थापनेचा आग्रह धरला होता. मात्र बाळासाहेबांनी पक्ष नव्हे तर संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. मराठी माणसांचे रक्षण करणारी मराठी संघटना स्थापन करण्याचा विचार बाळासाहेबांनी पक्का केला. हे जेव्हा प्रबोधनकारांना समजले; तेव्हा त्यांनी त्यांनी नाव सुचवले 'शिवसेना... शिवाजीची सेना... म्हणजेच शिवसेना.' प्रबोधनकार केशव ठाकरे यांनी महाराष्ट्र भ्रमण केले होते. त्यात त्यांना छत्रपती शिवराय आणि मराठी माणूस यांचे नाते जवळून पाहिले होते. मराठी माणसांच्या मनात शिवरायांविषयी असलेली भावना 'शिवसेना' या नावातून संघटनेत ओतण्याची ती प्रबोधनकारांची संकल्पना होती. नुसते 'शिवाजी महाराज की जय' म्हटल्याबरोबर मराठी माणसांच्या रोमारोमात स्फुलिंग प्रज्वलित होते; ते स्फुरण पाहूनच प्रबोधनकारांनी बाळासाहेबांच्या संघटनेला शिवरायांची सेना म्हणे 'शिवसेना' हे नाव दिले.

### दि.१९ जून १९६६




तो दिवस होता दि. १९ जून १९६६ चा. खुद्द बाळासाहेब आणि त्यांचे दोन बंधू आणि प्रबोधनकार असे ठाकरे कुटुंबातील चौघे आणि अन्य १४ निवडक व विश्वासू लोक बाळासाहेबांच्या घरी एकत्र जमलेले. नाईक नावाच्या बाळासाहेबांच्या एका सहकाऱ्याने गल्लीतीलच एका दुकानातून एक नारळ आणलेला. बरोबर सकाळी साडेनऊ वाजता प्रबोधनकारांनी नारळ फोडला आणि उपस्थित १८ लोकांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशी घोषणा दिली अन् शिवसेनेची स्थापना झाली. तीच शिवसेनेच्या स्थापनेची घोषणा होती. तीच घोषणा आजही कायम आहे. त्यानंतर लगेच 'मार्मिक'मधून शिवसैनिकांची नोंदणी सुरू असल्याचे प्रसिध्दीकरण करण्यात आले. त्या दिवशी 'मार्मिक'च्या कार्यालयावर तुडुंब गर्दी लोटली. बघता बघता शिवसेनेचे तब्बल दोन हजार पोस्टर्स अवघ्या तासाभरात संपले. पहिल्याच महिन्यात वीस हजार शिवसैनिकांची अधिकृत नोंद झाली. त्यानंतर शिवसेना ही मुंबईतील घराघरात आणि मराठी माणसांच्या मनामनात जाऊन पोहचली.

### शिवाजी पार्कवरचा पहिला मेळावा



दि.१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाली. त्यानंतर शिवसैनिकांची नोंदणी सुरू झाली. पुढे दसरा आला. दसऱ्याचा मुहूर्त साधून बाळासाहेबांनी दि.३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवाजी पार्कवर शिवसेनेचा दसरा मेळावा घेण्याचे जाहीर केले. हा शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा. या मेळाव्याला त्यावेळी पाच लाखांपेक्षा अधिक मराठी माणसांचा जनसागर लोटला होता. याच मेळाव्यात ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे शिवसेनेचे धोरण बाळासाहेबांनी जाहीर केले. तेव्हापासून पुढील ५७ वर्षे एक मैदान, एक पक्ष आणि एक नेता हे समीकरण शिवाजी पार्कशी तयार झाले. त्याच शिवाजीपार्कला पुढे शिवतीर्थ असे संबोधले गेले.


संकलन व संपादन : राजकुमार नरुटे | मांडणी व सजावट : अभिषेक उघडे




### राजकारणात प्रवेश

सन १९६७ साली ठाणे महानगरपालिकेची निवडणूक लागली. या निवडणुकीत शिवसेनेला उतरवण्याचा निर्णय बाळासाहेबांनी जाहीर केला. हा निवडणुकीच्या माध्यमातून शिवसेनेचा राजकारणात प्रवेश होता. पुढच्याच वर्षी म्हणजे १९६८ साली शिवसेनेने मुंबई महानगरपालिकेत प्रवेश केला. तिथून शिवसेनेच्या शाखा विस्ताराला सुरुवात झाली.

### शिवसेनेचे पहिले आमदार



दि. ५ जून १९७० साली कम्युनिस्ट नेते कृष्णा देसाई यांची हत्या झाली. त्यांच्या हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील राजकारण हादरले. त्यांच्या हत्येमुळे रिक्त झालेल्या विधानसभेच्या जागेवर पोटनिवडणूक लागली. या निवडणुकीत बाळासाहेबांनी वामनराव महाडिक यांना शिवसेनेची उमेदवारी दिली. शिवसेनेने ही निवडणूक ताकदीने लढवली. यामध्ये महाडिक विजयी झाले आणि शिवसेनेचा पहिला आमदार म्हणून वामनराव महाडिक राज्याच्या विधिमंडळात दाखल झाले.

### शिवसेनेचे पहिले महापौर



पुढच्याच वर्षी म्हणे १९७१ मध्ये शिवसेनेने मुंबई महापालिकेची निवडणूक लढवली. त्यावेळी महापालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन झाली. डॉ. हेमचंद्र गुप्ते हे मुंबई महापालिकेचे शिवसेनेचे पहिले महापौर झाले. त्यानंतर १९७२ साली विधानसभेत प्रमोद नवलकर यांनी प्रवेश केला. सन १९७३ मध्ये सतीश प्रधान ठाणे महापालिकेचे महापौर बनले. तेव्हापासून मुंबई महापालिकेवर शिवसेनेची सत्ता प्रस्थापित झाली. त्यानंतर अनेक महापौर झाले. सन १९९६ पासून मुंबई महापालिका ही शिवसेनेच्याच ताब्यात आहे.

### शिवसेनेची युती

शिवसेनेने काँग्रेसबरोबर अनेक वेळा मैत्री केली. १९८० साली काँग्रेसला मदत केल्याने शिवसेनेला विधानपरिषदेच्या दोन जागा मिळाल्या. १९८४ मध्ये भाजपबरोबर शिवसेनेने युती केली. ती तब्बल २५ वर्षे टिकली. सन २०१४ साली ही युती तुटली. शिवसेना आणि भाजपने स्वबळावर विधानसभा लढवली. निवडणुकीनंतर पुन्हा युती झाली. मात्र सन २०१९ मध्ये शिवसेना आणि भाजप यांची युती निवडणुकीनंतर तुटली.

### शिवसेनेचे मुख्यमंत्री




सन १९९५ मध्ये सेना-भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले. त्यावेळी शिवसेना नेते मनोहर जोशी यांना शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. याच काळात शेवटचे काही महिने शिवसेना नेते नारायण राणे हे मुख्यमंत्री झाले. पुढे सन२०१४ मध्ये पुन्हा सेना-भाजपचेच सरकार सत्तेवर आले. तेव्हा भाजप नेते देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले. त्यांना शिवसेनेने पाठिंबा दिला. म्हणजेच युतीचे तिसरे मुख्यमंत्री भाजपचे देवेंद्र फडणवीस झाले.

### शिवसेना सोडणारे नेते

शिवसेनेतील छगन भुजबळ, नारायण राणे यांनी शिवसेनेला कायमचा राम राम केला. त्याचबरोबर राज ठाकरे यांनी देखील शिवसेना सोडून स्वत:चा पक्ष स्थापन केला. हेमचंद्र गुप्ते, गणेश नाईक, राम जेठमलानी, चंद्रिका कोनिया यांसारख्या अनेक नेत्यांनी शिवसेनेला रामराम ठोकला.

### शिवसेनेचा वाघ गेला



दि.१७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईतील 'मातोश्री' या निवासस्थानी बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले. निधन झाल्याने पक्षाची सर्व जबाबदारी उद्धव ठाकरे यांच्यावर आली. त्याचबरोबर उध्दव ठाकरे शिवसेनेचे प्रमुख आणि 'सामना'चे संपादक झाले. परंतु मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांची नेमणूक झाल्यानंतर, 'सामना'ची सर्व जबाबदारी रश्मी ठाकरे यांना देण्यात आली.

### पक्षाला पक्षाघात

कोणत्याही राजकीय पक्षामध्ये प्रथम पक्ष, त्यानंतर कार्यकर्ता आणि नेता अशी उतरंड असते. मात्र पक्षामध्ये जेव्हा पक्षहितापेक्षा नेत्यांचे स्वहित मोठे होते; तेव्हा त्या पक्षाला पक्षाघात होतो. तो पक्ष हा पक्ष राहत नाही. पक्षात फुटीरता निर्माण होते. पक्ष फुटतो. कोणी कितीही आणि काहीही म्हटले तरी त्याचा फटका पक्षाला बसतोच. शिवसेना फुटीमध्येही नेमके हेच झाले. जेव्हा जेव्हा पक्षहितापेक्षा पक्षातील नेत्यांना स्वहित मोठे वाटू लागले; तेव्हा तेव्हा शिवसेना फुटली. पक्षहितापेक्षा स्वहित मोठे करू पाहणारे नेते शिवसेनेतून बाहेर पडले. नाही म्हटले तरी याचा फटका ज्या त्या वेळी शिवसेनेला बसला. पण प्रत्येकवेळी शिवसेना सावरली. पक्षाची पडझड रोखता आली. त्यामुळे पक्ष वाचला.

### हमे तो अपनो ने लुटा...



बाळासाहेबांनंतर उध्दव ठाकरे यांच्याकडे शिवसेनेची सूत्रे आली. बाळासाहेबांच्या निधनानंतर सन २०१४ साली झालेल्या निवडणुकीपूर्वी सेना-भाजप युती तुटली. 'हिंदुत्व' हा युतीचा समान धागा होता. याच धाग्यातून निवडणुकीनंतर सेना-भाजप पुन्हा युतीमध्ये एकत्र आले. मात्र या पाच वर्षांच्या सत्ताकाळात कोणी कोणाला फसवले? हे सेना आणि भाजपवाल्यांनाच माहीत. दोन्ही पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतात. सन २०१९ च्या निवडणुकीत एकत्र असलेले हे दोन्ही पक्ष निवडणुकीनंतर वेगळे झाले आणि शिवसेनेने दोन्ही काँग्रेससोबत आघाडी करत सत्ता हस्तगत केली. पक्ष मोठा करण्यासाठी ते आवश्यक होते म्हणून उध्दव ठाकरे यांनी ते केले. पण शिवसेना आणि ठाकरे हे समीकरण घट्ट असल्यामुळे शिवसेनेत राहून उध्दव ठाकरे यांना टाळून मोठे होणे शक्य नव्हते. त्यातून बाळासाहेबांच्या विचारसरणीचे कारण पुढे करून शिवसेनेत बंड झाले. त्यातून शिवसेना फुटली. पुढे हा मामला सर्वोच्च न्यायालयात आणि निवडणूक आयोगात पोहचला. राज्यघटनेनुसार स्वायत्त असणाऱ्या निवडणूक आयोगाने शिवसेना-ठाकरे हे समीकरण तोडले आणि ठाकरेंची शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या हवाली केली.

### पुढे काय...?



शेवटी उध्दव ठाकरे हेसुध्दा ठाकरेच आहेत. त्यांच्याही अंगात शिवसेना प्रमुख बाळासाहेबांचेच रक्त आहे. भलेही त्यांच्या काही चुका झाल्या असतील. त्यातून बाळासाहेबांची शिवसेना त्यांच्या हातून निसटली असेल. पण गप्प बसेल तर ते ठाकरेंचे रक्त कसले? शेवटी शिवसैनिक हा शिवसेनेचा श्वास आहे. हा शिवसैनिक कडवा आहे. त्याची बांधीलकी शिवसेनेशी आहे. बाळासाहेबांनी स्थापन केलेली शिवसेना आता ठाकरेंकडे राहिली नाही. म्हणून शिवसैनिकांची ती बांधीलकी शिवसेना-ठाकरे या समीकरणाशी राहते की शिवसेनेशी जोडली जाते? हे येणाऱ्या निवडणुकीतच समजणार आहे.